# एक गरीब पण घरगुती कॉलेज*

# (१९५४ - १९६४)




## *वालचंद कॉलेज ऑफ इंजिनीयरिंग

### विश्रामबाग, सांगली, महाराष्ट्र, भारत

**कल्पना व संपादक: अरविंद गोरे**

लेखन: मुरलीधर बेरडे, मंगेश नाडकर्णी, मोहन पटवर्धन, सुभाष सुखठणकर, दत्तात्रय भेंडे, श्रीनिवास दिवेकर, सुभाष कीर्तने, आणि अरविंद गोरे

---

गेल्या ३८ वर्षांपासून टोरांटो, कॅनडाहून प्रसिद्ध होणाऱ्या "एकता" या त्रैमासिकात आमच्या ह्या आठवणींची लेखमाला जानेवारी व एप्रिल २०१७ या दोन अंकात प्रसिद्ध होणार आहे.

= ३१ डिसेंबर २०१६ =

*आठवणींचे मोरपीस जे, जुन्या पुस्तकी दडलेले*

*नाजुक स्पर्शे कुरवाळावे, नीबर गाली हळू फिरवावे*

*दुखरे दुखरे मन सुखवावे*

# अनुक्रमणिका

१. एक गरीब पण घरगुती कॉलेज (अरविंद गोरे)..........................३
२. वालचंदचे दिवस आणि रात्रीही (मुरलीधर बेरडे)....................२१
३. Memories of Walchand College (मंगेश नाडकर्णी).........२२
४. वालचंद कॉलेजच्या आठवणी (मोहन पटवर्धन).....................२३
५. सुखद आठवणींचे मोरपीस (सुभाष सुखठणकर).....................२५
६. माझी वालचंद कॉलेजची वाटचाल (दत्तात्रय भेंडे) .................२८
७. माझ्या आठवणी, तसेच **लिंबोणी प्रकरण**[1] (श्रीनिवास दिवेकर)[2].३०
८. वालचंद कॉलेजच्या काही आठवणी (सुभाष कीर्तने)...............३३

सटर फटर

वालचंद कॉलेज व परिसर (Sketch 1) ४
दोन पत्रे ८
निवडणुकीचे 'हॅंडबिल' १८
कविता १९
बत्तीस शिराळे फोटो २०

## पार्श्वभूमी व आवाहन

आम्ही बहुतेकजण १९५६ च्या बॅचचे. वालचंद कॉलेजच्या आठवणी लिहिण्याच्या माझ्या कल्पनेस सुभाष कीर्तने, सुभाष सुखठणकर व मुकुंद आपटे यांनी त्यास सक्रीय पाठींबा दिला. त्यांच्यामुळे मंगेश नाडकर्णी, मुरलीधर बेर्डे व मोहन पटवर्धन यांच्याशीही संपर्क झाला. त्यासाठी आम्हा सर्वांनी केलेल्या परिश्रमाचे हे फळ. हा उपक्रम पुढेही चालू ठेवण्याचा मनोदय असल्याने यात माजी विद्यार्थ्यांना सहभागी व्हायचे असेल तर त्यांनी त्यांच्या आठवणी मला इमेलने पाठवाव्यात ही विनंती. त्या मराठीत टाईप केल्या तर उत्तमच. ज्याना ते शक्य नाही त्यांनी आपल्या हस्ताक्षरातील आठवणी 'scan' करून पाठवल्या तर त्या मी मराठीत टाईप करून त्यांचा यात समावेश करेन. माझा इमेल पत्ता: **aravindgore@gmail.com** *(Please note that I spell my name* ***'aravind'*** *[with 'a' between 'r' and 'v'] and not 'arvind'.)* Phone number: 1-240-888-7843 in USA.

[1] "लिंबोणी प्रकरण" हे त्यावेळी महाराष्ट्रात बरेच गाजले. त्यामुळे कॉलेजला विनासायास प्रसिध्दी मिळाली.
[2] श्रीनिवास गेल्या ऑगस्ट २०१६ मधे गेल्याचे कळले. वाईट वाटले. शेवटी 'कालाय तस्मै नम:'

# आठवणीतील एक गरीब पण घरगुती कॉलेज

## अरविंद गोरे BE(Civil) 1956-1959 [संपर्कः aravindgore@gmail.com]

१९५० चे दशक. पुणे बंगलोर रेल्वे मार्गावरील मिरज जंक्शनहून दहा मैलावर सांगलीकडे जाणारा छोटासा एकपदरी रेल्वेचा फाटा. त्यावरचे विश्रामबाग हे लहानसे स्टेशन[3] $_{(१)}$. सांगलीपासून तीन एक मैलावर. त्याला लागूनच ब्रिटीशांच्या अमदानीपासून असलेले जुने विलिंग्डन कॉलेज व त्याचे हॉस्टेल. यामुळेच हे स्टेशन वसले असावे हा माझा अंदाज. सांगलीकडे जाण्याऱ्या व तिकडून येणाऱ्या दिवसातून सातआठ गाड्या. त्याचवेळी थोडीफार वर्दळ. नाहीतर एरवी नुसता शुकशुकाट असायचा.

स्टेशनच्या एका अंगाला हे कॉलेज तर दुसऱ्या अंगाला 'नातूं'चे $_{(४)}$ हॉटेल, दोन चार दुकाने $_{(३)}$, आठ दहा घरे $_{(२)}$ सोडली तर बाकी सारीकडे नुसती शेतजमीन. विश्रामबाग गाव असे नव्हतेच. त्याच्याच बाजूला अशा उजाड निर्मनुष्य शेतांत उभे राहिलेले आमचे "एक गरीब पण घरगुती कॉलेज – वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिरिंग".

*टीप: या लेखात उल्लेख केलेली सर्व स्थळे (त्याचप्रमाणे त्यांच्या जवळच्या कंसातील आकडे) पान ४ वर दाखवली आहेत.*

## थोडा पूर्वेतिहास[4]

त्याकाळी महाराष्ट्रात पुण्याचे व मुंबईचे व्हीजेटीआय (VJTI) ही जुनी बऱ्याच वर्षापासून प्रस्थापित झालेली ही दोनच इंजिनीरिंग कॉलेजेस होती. जुनीपुराणी, सरकारी, चांगला शिक्षकवर्ग व भरपूर सुविधा असल्याने प्रसिद्ध व नावाजलेली. त्यामुळे ज्याना तेथे प्रवेश मिळे तसेच आर्थिक दृष्ट्या परवडणारे असेल त्यांचा ओढा सहाजिकच तिकडे. बाकीचे सर्वजण नव्याने सुरु झालेल्या आमच्या वालचंद कॉलेजात.

तेव्हा भारताला स्वातंत्र्य नुकतेच मिळाले होते. पंचवार्षिक योजनेखाली कारखाने, रस्ते, धरणे, कालवे, वगैरेच्या बांधकामाला (Infrastructure) मोठ्या प्रमाणावर सुरवात होत होती. त्याच काळात श्री. धोंडूमामा साठे हे महाराष्ट्रात प्रसिद्ध व प्रस्थापित 'मराठी' कंत्राटदार होते. आता इंजिनियर्सची मागणी वाढणार हे लक्षात घेऊन व मुख्य म्हणजे "बांधकामाच्या क्षेत्रात मराठी माणसांनी पुढे आले पाहिजे" या कळकळीने, त्यांनी इतर सहकाऱ्यासमवेत भांडवल जमा करून Maharashtra Technical Education Society - MTES.) ही संस्था स्थापली. तिच्यावतीने *'न्यू इंजिनियरिंग कॉलेज'* या कॉलेजची मुहूर्तमेढ रोवली. ते साल होते १९४७. या उपक्रमात सांगलीचे संस्थानिक राजेसाहेब पटवर्धन यांनी सतत खूप पाठींबा व आर्थिक सहाय्य दिले. त्यांच्याच मदतीने विश्रामबागला मोठी शेतजमीन खरेदी केली व काही बांधकाम पक्के तर बाकीचे तात्पुरते (जुजुबी? कच्चे?) करून कॉलेजला सुरवात तर झाली.

---


[3] The number in subscript refers to the place shown in Sketch 1.

[4] References

a. Memories of College as a student by Shri. L. G. Gole

b. My Memories of the College by Prof. H. U. Kulkarni

c. walchandcollege.blogspot.com




1. Railway Station
2. Houses
3. Shops
4. 'Magdum' Bldg./'Natu's' Restaurant
5. Old Mess
6. Bath-House
7. Old Hostel
8. Taps- 'Katta'
8A. Scholar Block
9. Water Well
10. Old Canteen
10A. Old Gymnasium
11. Main Building
12. Open Auditorium
13. Workshop
13A Diploma Lab.
14. Mechanical Lab.
14A. Electronic lab.
15. Electrical Lab.
16. Drawing Hall
17. Globe
18. Professors' Houses
18A. New Canteen
19. Development Blocks
19A. Garden
20. New Mess
21. New Hostel
22. Playground

प्रथम हे कॉलेज 'बॉम्बे युनिव्हर्सिटी'शी संलग्न होते पण १९४८ सालापासून पुणे युनिव्हर्सिटी[5]शी. आधी फक्त स्थापत्यशाखा (Civil Engineering) उघडली. ही सुरवातच असल्याने प्रवेशसंख्याही अल्प होती. पहिली काही वर्षे परीक्षेचा निकाल ३० ते ४० टक्के एवढाच असे. त्यावेळी B.E. या पदवीचा शिक्षणक्रम तीन वर्षांचा. पण त्या तीन वर्षात पुरे करण्याचे प्रमाण मात्र ३० ते ४० टक्केच असल्याने पदवी मिळवायला काही बरेच वर्षे घेत. मग हळूहळू परिस्थिती बदलली व या दोन्ही टक्केवारीत वाढ होत गेली.

मराठी माणसांच्या सुरवात केलेल्या नवनव्या उपक्रमाना नेहमीचा शाप म्हणजे 'उंच ध्येय, ते साध्य करण्याकरता अपार कष्ट करण्याची तयारी पण अपुऱ्या भांडवलामुळे पैशाची सदैव चणचण'. हा शाप येथेही भोवला. आर्थिक परिस्थिती डबघाईला येत चालली. सुदैवाने १९५५ सालापासून महाराष्ट्र व केंद्र सरकारने आर्थिक मदत (grant) द्यायला सुरवात केली. त्याचबरोबर 'वालचंद ट्रस्ट'कडून ५ लाखांची देणगी मिळाली. पण त्याचमुळे *'न्यू इंजिनियरिंग कॉलेज'* हे नांव "वालचंद कॉलेज ऑफ इंजिनीयरिंग" म्हणून बदलावे लागले[6]. तसेच कॉलेज चालवण्याची जबाबदारी (management) MTES कडून एक नव्या कमिटीकडे आली. या बदलामुळे आर्थिक परिस्थितीत उर्जितावस्था आली, स्थैर्य प्राप्त झाले. त्यामुळे १९५५ सालापासून 'सिव्हिल' शाखेबरोबर 'मेकॅनिकल' व 'इलेक्ट्रिकल' या शाखा व या तिन्ही शाखेत डिप्लोमा कोर्सेसही सुरु झाले आणि नव्या हॉस्टेलचे(१९) व मेसचे(२०) (जेवणघर?) बांधकाम हाती घेतले. अशा रीतीने कॉलेजच्या प्रगतीला व विस्तार व्हायला सुरवात झाली.

*टीप: श्रीनिवास दिवेकरने १९५४मधे प्रवेश घेतल्याने १९५४ ते १९५६च्या काळात घडलेल्या घटनांची त्याने सविस्तर माहिती त्याच्या आठवणीत दिली आहे. त्याकरता पान ३० पहावे.*

या पार्श्वभूमीवर आम्ही सर्वांनी १९५६ साली कॉलेजमध्ये प्रवेश घेतला.

## कॉलेज प्रवेश

वर म्हटल्याप्रमाणे देशात नवीनवी बांधकामे सुरु झाल्याने इंजिनियर्सची मागणी वाढत चालली होती व त्याचबरोबर विद्यार्थ्यांची प्रवेशाकरता स्पर्धा. शाळेच्या अकरावीनंतर[7] कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाच्या (Inter Science) परीक्षेतील मार्क्सवर प्रवेश अवलंबून. साधारणपणे त्यात प्रथम वर्ग मिळाला की प्रवेश मिळे. त्यामुळे प्रत्तेकाची त्या परीक्षेत जास्तीत जास्त गुण मिळवायची धडपड.

प्रवेशासाठी या परीक्षेतील व इतर गोष्टींचे[8] मार्क्स मिळवून एकूण बेरजेवरच प्रवेश अवलंबून असल्याने त्यात वशिल्याचा, पैशाचा किंवा ओळखीचा संबंध नव्हता. माझ्या मते ही अत्यंत नि:पक्षपाती व पारदर्शी पद्धत होती. सर्व दृष्टीने मला सोयीचे म्हणून मी 'वालचंद'ला अर्ज केला. *(अर्ज मिळाल्याची पावती पान ७ वर आहे.)*

ज्याना प्रवेश मिळाला व जे 'वेटिंग लिस्टवर' (प्रतीक्षा यादी?) त्यांच्या नांवांची यादी गुणानुसार कॉलेजच्या नोटीस बोर्डावर लावली जायची. त्यातले काही दुसरीकडे गेले वा प्रवेश नाकारला त्यांची नांवे 'कटाप' (cut-off चा अपभ्रंश?). करून 'वेटिंग लिस्टवर'च्याना प्रवेश. असा खुल्लम खुल्ला मामला. का कोणास ठाऊक पण दोन जागा काश्मिरी विद्यार्थ्यांच्या करता राखीव होत्या. असो. अशा रीतीने आमचा कॉलेजात प्रवेश झाला.

## कॉलेज

[5] "युनिव्हर्सिटी ऑफ पूना" हे त्या वेळचे नाव
[6] त्याचबरोबर 'वालचंद ट्रस्ट'साठी ५ जागा राखीव होत्या.
[7] अकरावी पास झाल्यावर हायस्कूल शिक्षण पुरे झाल्याचे SSC Certificate मिळायचे.
[8] इतर गोष्टी: मॅट्रिकला ७० टक्क्याहून मार्क्स, ड्रॉइंगची दुसरी परीक्षा पास, एन.सी.सी. मध्ये सहभाग (National Cadet Core) याला प्रत्तेकी १० मार्क्स.

कॉलेजची मुख्य इमारत(११) चौकोनी म्हणजे मध्ये एक मोठी मोकळी जागा (पटांगण?) व त्याला चारी बाजूनी वेढलेली (Quadrangle ) एक मजली इमारत. त्यातच आमचे सर्व वर्ग होते. दर्शनी बाजूत प्रवेशद्वार व

मागल्या बाजूत खुले रंगमंदिर(१२) (Open stage/auditorium). दरवर्षीच्या आमच्या स्नेहसंमेलनाची जागा.

मुख्य इमारतीसमोर १५ - २० फूट व्यासाच्या काँक्रीटचा 'पृथ्वीगोल'(१७). त्याचे "ग्लोब" हे आम्ही दिलेले नांव. दर वर्षी २६ जानेवारी हा "हॉस्टेल डे" (Hostel day) येथे साजरा होत असे.


या इमारतीजवळ एका बाजूला 'मेकॅनिकल'(१४) व 'इलेकट्रिकल'(१५) लॅब्स व वर्कशॉप(१३) या तीन इमारती. लॅब्समध्ये साधने, उपकरणे पैशाची वानवा असल्याने जुनी, थोडी केवळ काम भागवण्यापुरती. पण हि गोष्ट आम्हाला त्यावेळी तरी जाणवली नाही. वर्कशॉपमध्ये लोहारकाम, सुतारकाम, Lathe work वगैरेसाठी. त्याची आम्हाला प्रत्यक्ष माहिती व्हावी हा शिक्षणाचा भाग होता. त्यात काम करण्यासाठी आम्हाला अंगावर 'बॉयलर सूट' चढवावा लागे. (निदान मला तरी त्याचे भारी कौतुक वाटे.) मुख्य इमारतीच्या दुसऱ्या बाजूला ड्राफ्टिन्ग (Drafting) शिकण्यासाठी 'ड्रॉइंग हॉल'(१६).

या अशा मोजक्याच इमारती व जवळजवळ असल्याने कॉलेजचा पसारा (Footprint) मोठा आटोपशीर होता.

## पहिले वर्ष

आमच्या बॅचमध्ये २५ ते ३० टक्के पुण्यामुंबईचे बाकीचे उर्वरित महाराष्ट्रातून. त्यातही विशेषत: सातारा, कोल्हापूर व बेळगाव जिल्ह्यातले. गरीब, श्रीमंत, शहरी, खेडवळ, कानडी, मराठी व इंग्रजी माध्यमातून शिकलेले अशी सरभेसळ होती. त्यातहि काही पारशी, बोहरी, ख्रिश्चन विद्यार्थी होते. सांगली, मिरजेचे स्थानिक विद्यार्थी रोज घरून आगगाडीने यायचे. बाकी परगांवचे आम्ही सर्व हॉस्टेलवर. आम्हा विद्यार्थांत बहुतेक सारे मध्यमवर्गीय. घर सोडून हॉस्टेलमधे व स्वतंत्र रहाण्याची पहिलीच वेळ.

यापावेतो विद्यार्थ्यांची संख्या वाढल्याने वरच्या वर्गातील बहुतेक मुलांची सोय नव्या हॉस्टेलमध्ये केली होती. त्यातून उरलेले काही व आम्हा सर्व नवथर मुलांची जुन्या होस्टेलमध्ये. कॉलेज सुरु झाले तेव्हा पैशाची कमतरता असल्याने भागवाभागवी करण्याच्याच हेतूने तात्पुरते म्हणून बांधले गेले असणार. हे जुने हॉस्टेल मोठे नामी होते म्हणून त्याचे व तेथील एक वर्षाच्या वास्तव्याचे सविस्तर वर्णन करणे अनिवार्य आहे.



~~New Engineering~~ College, Sangli.


WALCHAND COLLEGE OF ENGINEERING
SANGLI (BOMBAY STATE)
RLY. STATION – VISHRAMBAG.

**Acknowledgment.** Date 19-5-56

1. Your application for admission has been received along with the registration fee. Your name has been registered under No. 239 which must be quoted in all further correspondence. Any change in your address should be intimated at once.

2. You will be informed either by letter or by telegram if you can be granted admission, Such admission will be conditional on your joining at once if selected, and paying the prescribed fees. In case of failure to do so you will lose the seal.

Principal



Walchand College of Engineering Sangli

Dated 17 MAY 1957

Dear Student,

I congratulate you on your success at the F.E. / ~~S. E. (C. M. & E.)~~ Examination, having secured ~~a I class~~ / II class / ~~pass class / A. T. K. T.~~

The college opens for regular lectures For S. E. / ~~T. E.~~ class on 10th June 1957. The first Instalment of Fees of Rs. 136 (100 tution & 36 others) must be paid on or before 10th June without which your name will not be registered & you will not be allowed to attend the lectures.

for Principal

वरचे पत्र: प्रवेशासाठी केलेल्या अर्जाची पोच.

खालचे पत्र: पहिल्या वर्षात दुसऱ्या श्रेणीत उत्तीर्ण झाल्याचे प्रो. व्ही. ए. जोशी यांचे पत्र

**'जुने हॉस्टेल'** (७)

जुन्या हॉस्टेलच्या चार इमारती. प्रत्तेकात दोन्ही बाजूला खोल्या व मध्ये निरुंद पॅसेज. प्रत्तेक दोन विद्यार्थी. सर्व बांधकाम कच्चे (तात्पुरते) असल्याने विटांच्या भिंती बांधताना सिमेंट मॉर्टर ऐवजी चिखल वापरला होता. बाहेरच्या भिंती एक विटेच्या (९ इंच) तर दोन्ही खोल्यांमधील अर्ध्या विटेच्या (४-१/२ इंच). एकदोघांनी भिंतीतील एक वीट काढून त्या भोकातून पलीकडच्या खोलीतील विद्यार्थ्याशी संभाषण करण्याचा उपद्व्यापही केला होता. भिंतीना गिलावा (plaster) होता की नाही हे आठवत नाही पण त्यावर पांढरा रंग फासलेला. दाराखिडक्यांच्या चौकटी लाकडी व त्यावर पत्रा मारलेला. खिडक्याना गजाऐवजी उभ्याआडव्या पातळ लोखंडी पट्ट्या ठोकलेल्या. छप्पर 'स्टील'च्या (galvanized corrugated steel) पत्र्यांचे. पावसाळयात पावसाच्या थेंबांचा दणदणीत आवाज यायचा. उन्हाळयात खोलीत जाम गरम व्हायचे. अशा या खोल्यातून पाचसहा जण एकत्र येऊन आमच्या गप्पा गोष्टी सुखाने होत असत.

दोन्ही बाजूंच्या खोल्यांमधून जाणारा एक अरुंद 'पॅसेज'. त्याच्या एका कडेला तिपायीवर पाण्याचा माठ व सोबत एक लांब दांडीचे पाणी प्यायला भांडे. खोल्या एवढ्या छोट्या की दोघाजणाना वावरताना कसरत करावी लागे. दोन्ही खाटामधील अंतर एवढे लहान की आपल्या बिछान्याखालची ट्रंक काढायची असेल तर दुसऱ्याच्या बिछान्यावर बसून ओढायची मग काम झाल्यावर परत मागे सरकवून ठेवायची. आता वाटते ते हॉस्टेल म्हणजे अक्षरशः 'कोंबड्यां'चे खुराडेच होते. त्यावेळी मात्र ते जाणवले नाही.

सकाळी उठल्यावर हातपाय धुवायला व दात घासायला बाहेरच्या कट्ट्यावर(८) जावे लागे. तेथे उघड्यावर पाण्याच्या एका छोट्या काँक्रीट टँकमधून एकमेकाला लागून काढलेल्या सात आठ तोट्या (नळ) व सभोवती कट्टा. तिथे हा कार्यक्रम सार्वजनिकपणे चालायचा. त्यामुळे सकाळी भेटण्याचा व उभ्याउभ्या गप्पा मारण्याचा हा कट्टा होता.

आंघोळीकरता पाचसहा मोऱ्या होत्या. प्रत्तेकात गार पाण्याचा नळ. त्यांनाही तिन्ही बाजूनी पत्रे. दार आणि छप्परही पत्र्याचेच. लगतच्या बॉयलरमधून गरम पाण्याच्या दोन बारड्या[9] (बादल्या) नोकर आणून द्यायचा त्यावरच आंघोळ आटपावी लागे.

दुपार व रात्रीची जेवणे मेसमध्ये(५). दर रविवारी दुपारच्या जेवणाला एखादे 'पक्वान्न' असल्याने आमची 'फीस्ट'! त्यादिवशी रात्री मेस बंद. दुपारी भरपूर जेवल्याने रात्रीचे खाणे कँटीनमधे नाहीतर 'नातू'कडे ऑमलेट किंवा 'मस्का पाव' व चहा. अगदीच उत्साह असेल तर गाडीने (म्हणजे आगगाडीने) मिरजेला स्टेशनवर जायचे कारण ते जंक्शन असल्याने प्लॅटफॉर्मवरच पानात बांधून दहीभात किंवा इडली-चटणी मिळायची. पुन्हा दुसऱ्या दिवसापासून कॉलेज.

सकाळ दुपारचा चहा व खाण्याकरता एका उडुपी माणसाला चालवायला दिलेले कँटीन(१०). तेथे चहा एका आण्याला[10] तर इडली/वडा सांबार वगैरेना दोन आणे. कँटीनच्या समोर एक चांगली बांधीव मोठी विहीर(९) होती व त्यावर एक इलेक्ट्रिक पंप बसवला होता. यातूनच कॉलेजला पाणी पुरवठा होत असावा (अशी माझी समजूत आहे).

या सर्व इमारतींची 'हालत' अगदी जुन्या हॉस्टेलसारखीच होती.

कॉलेजच्या आवारातले सर्व रस्ते पक्के नव्हते. नुसती मुरमाची[11] खडी टाकून बनवलेले. त्यामुळे पावसाळयात पादत्राणे चिखलाने माखून जायची. त्यावर उपाय म्हणून कातड्याऐवजी 'टायर'च्या (Tire or Tyre) तुकड्यांनी बनवलेल्या चपला दहा बारा आण्यांत मिळायच्या. त्यांचा तळवा (Sole) जाड असल्याने चिखलात चालले तरी पाय स्वच्छ राहायचे आणि नळाखाली पाण्यात धरल्यावर पुन्हा स्वच्छ! पावसाळयात आमचा सर्वत्र वावर त्याच चपला घालून व्हायचा. त्या सर्व एकाच मापाच्या असल्याने (One size fits all) त्यांना दिलेले नांव होते 'ब्रॉडगेज' (Broad gage) चपला. त्याविषयी एक गोष्ट ऐकली आहे. आम्ही दुसऱ्या वर्षी असताना कॉलेजात

[9] हा खास सांगली कोल्हापूरकडचा शब्द

[10] त्यावेळी दशमान पद्धत सुरु न झाल्याने, सोळा आण्यांचा एक रुपया व चार पैशांचा एक आणा अशी नाणी.

[11] मुरूम म्हणजे पिवळसर रंगाचे ठिसूळ दगडाचे बारीक तुकडे. त्याला Macadam म्हणतात हे आम्ही Roads and Highways या विषयात दुसऱ्या वर्षी शिकलो.

एका नवख्या विद्यार्थ्याला सांगितले होते की या चपला घेण्याची जरुरी आहे कारण त्या रबराच्या असल्याने 'इलेक्ट्रिकल लॅब'मधे काम करताना वापरल्या तर शॉक (Electric Shock) बसत नाही. हे ऐकून खात्री करण्याकरता 'सरांना'ना भेटल्यावर ते नुसते हसले व त्याला परत पाठवले. असो.

## सुरवातीचे दिवस

कॉलेजात गेल्यावर सर्वात प्रथम खालील गोष्टींची जरुरी असल्याने त्यांची खरेदी प्रत्तेकाला करावीच लागे.

1. आकडेमोड करण्यासाठी एक स्लाईड रूल (Slide Rule) [बेरीज, वजाबाकी सोडून त्यावर इतर सर्व मोठ्या आकडेमोडी करता येतात.] सुदैवाने माझ्या भावाने 'डिप्लोमा कोर्स' केल्याने त्याच्याकडून तो मला मिळाला[12]. त्यावर छोट्या मोठ्या गुणाकार, भागाकारांची उत्तरे पहिल्या तीन आकड्यापर्यंत बरोबर येत असत. त्यामुळे त्याला Slide Rule Accuracy हा म्हटला जाणारा वाक्प्रचार कॉलेजात व नंतर नोकरीतही आमच्या बोलण्यात नेहमी असे.
2. पुस्तके. इंजीनियरिंगची पुस्तके बरीच महाग असत. ती बहुतेक सारी पहिल्याच वर्षी लागणारी. त्यानंतर त्यांचा उपयोग नसल्याने त्यावर उपाय म्हणजे वरच्या वर्गातील मुलांच्याकडून त्यांनी वापरलेली पुस्तके कमी किमतीत घ्यायची व वर्षभर वापरून झाल्यावर पुन्हा नव्या विद्यार्थ्यांना विकायची. अशी साखळी बरेच वर्षे चालायची. माझ्याकडचे एक पुस्तक माझ्याआधी सहा जणांनी वापरले होते. त्यावर प्रत्तेकाचे नांव व वर्ष एका खाली एक असे ओळीने लिहिलेले होते. पुन्हा विकण्याच्या दृष्टीने बरेचजण पुस्तके काळजीपूर्वक वापरत.
3. ड्रॉईंगसाठी लागणारी साधने, म्हणजे इन्स्ट्रुमेंट बॉक्स, templates, triangles वगैरे. सुदैवाने माझ्या थोरल्या भावाने इंजिनियरिंग डिप्लोमा केलेला होता म्हणून या गोष्टी व एकदोन प्स्ताकेही मिळाली व माझी सोय झाली.

### अभ्यासक्रम

पहिल्या वर्षात सर्व शाखेतील आम्हा सर्वांचा अभ्यासक्रम समान होता. दुसऱ्या वर्षापासून विषयांची फारकत प्रत्तेक शाखेप्रमाणे व्हायची. साधारणपणे सकाळी क्लासेस असायचे व दुपारी वर्कशॉप(१३), लॅब्स(१४, १५), ड्रॉईंगरूम(१६) वगैरे.

वर्कशॉपमध्ये निळ्या रंगाचा 'बॉइलरसूट' (We call it Coveralls in America and it is typically worn by Technicians and Mechanics.) घालावा लागे. त्याचे आम्हाला कौतुक. तेथे लोहारकाम, सुतारकाम करण्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळे. बहुतेक सर्वांनी असली कामे कधीच केली नसल्याने तो अनुभव वेगळाच होता. काही मुलांच्यात ही कला उपजत असल्याने त्यांचे काम कसे सुबक असायचे त्यापुढे आमचे काम ओबडधोबड दिसायचे. गणपत शिंदे हा असा जात्याच गुणी कारागीर (Artisan). त्याने एकदा बरेच खडू कोरून त्यातून ताजमहालची प्रतिकृती काय सुरेख बनवली होती की त्याला जवाब नाही.

मेकॅनिकल लॅबमधे तेथे असलेले फक्त एक जुने Heat Engine and Boiler यांचीच आठवण आहे. ड्रॉईंग हॉलमध्ये 'ड्राफ्टीन्ग' (Drafting) शिकताना वेगवेगळ्या 'घनते'च्या ('वजना'च्या? i.e. different weights) रेषा काढणे, अंतर दाखवण्याकरता रेघेच्या दोन्ही बाजूंना बाणांची टोके काढणे यात माझी झटापट चालायची. ते जमेपर्यंत खूप खाडाखोड झाली तर कागद खराब होई. आमचे दोन्ही शिक्षक 'बाम' व 'देवधर' यांचे 'लाईनवर्क' (line work) व बाण कसे सुरेख दिसायचे याचा मला नेहमी अचंबा वाटे. शेवटी 'प्रयत्नांती परमेश्वर' हेच खरे हे पटले[13].

पहिल्या वर्षी सर्वांना तिन्ही शाखांची तोंडओळख व्हावी म्हणून प्रत्तेक शाखेतील दोन तीन विषय अभ्यासक्रमात होते खरे. पण स्थापत्य सोडून दुसऱ्या दोन्ही शाखेतील विषयांचा उपयोग पुढच्या आयुष्यात कधीच झाला नाही[14]. सर्वांना उपयोगी असा फक्त एक विषय Materials. या विषयांत दगड, धोंड्यापासून स्टील,

[12] कॉलेज संपल्यावर भारतात सहा वर्षे काम करत असताना मी तोच स्लाईड रूल वापरला.

[13] After finishing college, I worked as a Design Engineer always on the drafting board for the first 9 years where I had to design, draft and prepare Design drawings. this college experience came really handy during those years.

[14] In my 'Heat Engines' class, the word 'Entropy'. I could never figure out what it meant then or even now.

अल्युमिनम, काँक्रीट, या साऱ्या गोष्टींचे गुणधर्म (properties) व त्यांचे उपयोग याची माहिती दिलेली मग यात शिकण्यासारखे काय? नुसते पाठांतरच करणे. मला आठवतेय की परीक्षेच्या आदल्या रात्री जागून मी घोकंपट्टी करून हे गुणधर्म लक्षात ठेवले. दुसऱ्या दिवशी पेपर संपल्यावर पुन्हा माझी पाटी कोरी.

## शिक्षकवर्ग

अख्ख्या कॉलेजात फक्त तीनचारशेच विद्यार्थी असल्यने शिक्षकांची संख्याही मोजकीच होती. त्यातील बहुतेक सारे "पीडब्ल्यूडी" (PWD) किंवा संरक्षण खात्यातील बांधकाम विभागातले, नोकरी सोडून वा सेवानिवृत्त होऊन आलेले. शैक्षणिक क्षेत्रातले कोणीच नसावेत. अपवाद असेल तो व्हाईस प्रिन्सिपाल व्ही. ए. जोशी यांचाच असे वाटते. त्याचप्रमाणे काही दाक्षिणात्य सोडले तर बाकीचे बहुतेक सारे महाराष्ट्रीय व त्यांचे इंग्रजी मराठी थाटाचे.

सर्व शिक्षकवर्ग वयस्क, पूर्वीच्या पठडीतले. शिक्षक म्हणजे सदैव गंभीर, मुलांच्यापासून नेहमी अलग रहाणारा हे मनात भिनलेले. याला अपवाद म्हणजे फाटकसर. तरीपण हे आवर्जून सांगावे वाटते की सर्वजण सुस्वभावी, आम्हा सर्वाबद्दल आस्था, कळकळ बाळगणारे, आमच्या भल्यासाठी मन:पूर्वक प्रयत्न करणारे, व लागेल तशी मदत करणारे होते.

सर्व वर्गात मुलांची संख्या थोडकीच असल्याने सर्व सरांना सर्वांची नांवे जरी माहित नसली तरी आम्ही चेहऱ्याने परिचित होतो. त्यामुळे कॉलेजचे एकूण वातावरण वरच्या श्रेणीतील हायस्कुलसारखे व घरगुती होते.

व्ही. ए. ही व्यक्ती Theory of Structures मधील 'दादा'माणूस. कितीही अवघड प्रश्न फळ्यावर 'इथी'पासून 'तिथी'पर्यंत सुवाच्य अक्षरात साग्रसंगीत सोडवायचे व सोबत त्यावर संथ सुरात व्यवस्थित समजून द्यायचे. गणिताचे केतकर चांगले शिकवायचे पण त्यांचे शिकवणे रुक्ष वाटायचे. त्यांच्या Partial Differential Equations म्हणजे काय व त्यांचे प्रयोजन यांचा पत्ता तेव्हा आणि त्यानंतरही कधी लागला नाही. अभ्यंकरसर बोलण्यात अघळपघळ; त्यांचे विषयही सोपे, साधे, सरळ असायचे. शिकवण्याबरोबरच कॉलेजचे नवे बांधकाम चालू होते त्यावर देखरेख करण्याची त्यांच्यावर जबाबदारी होती. रिसबूडसरांचा आठवत असलेला विषय Water Supply and sanitary Engineering. त्यांचा तास नेहमी जेवणाच्या सुटीनंतर असल्याने वर्गात सुस्ती यायची. विषय आधीच रटाळ. त्यात त्यांचे बोलणे व शिकवण्याची पद्धतही पेंग यायला अनुकुल होती. वर्गात मुलांची चुळबुळ व्हायची. मग ते म्हणायचे 'वर्गात झोपला तरी हरकत नाही, गैरहजर राहिला तर मी तुमची हजरी मांडेन, पण माझ्या शिकवण्यात अडथळा आणू नका'.

फाटकसर इंग्लंडहून (बहुदा उच्च शिक्षण घेऊन) परत आल्यावर त्यांनी लगेच कॉलेजात Electrical Engineering शिकवायला सुरवात केली. फाटकसर तसे उंच, गोरेपान. ते पहिल्याच तासाला आले तेव्हा अंगावर चांगला सूट, गळयात नेकटाय, इंग्रजी बोलण्यावर इंग्लंडहून आल्याची झाक. काही दिवसात गळयातला टाय गळला, नंतर कोट (Jacket) आणि त्यांचे इंग्रजी बोलणेही सुधारले? केतकरसरही बहुदा जर्मनीला गेले असावेत कारण ते उत्साही विद्यार्थांना जर्मन भाषा शिकवण्याचा क्लास संध्याकाळी घेत असत.

आता बर्वेसरांच्याबद्दल लिहायचे म्हणजे तो एक मोठा लेखच होईल म्हणून थोडक्यात.

बर्वेसर सरंक्षण खात्यातून आल्याने त्यांचा 'मिलिटरी" खाक्या असायचा. शिस्तीला चोख. त्यात हयगय नाही. स्वभावाने सरळ, सज्जन त्याचबरोबर एकदम 'भडकू'. (In other words, he had a short fuse.) कॉलेजच्या सुरवातीपासून असल्याने त्यांच्यावर पहिल्यापासून बऱ्याच जबाबदाऱ्या होत्या. 'सर्व्हेइंग' (Surveying) हा त्यांचा विषय. हॉस्टेलचे 'रेक्टर' असल्याने तेथील सर्व विद्यार्थ्यांची जबाबदारी, 'मेस' (Mess)चा जमाखर्च पहाणे, शिवाय किरकोळ कामासाठी (maintenance or repairs) हाताखाली असलेल्या मजुरांच्याकडून काम करवून घेणे, त्याचप्रमाणे काही कार्यक्रम होणार असतील तर त्यांची व्यवस्था वगैरे. त्यामुळे त्यांचे अस्तित्व सर्वत्र असायचे. माझ्यावर प्रसंग आला नाही पण मी असेही ऐकले आहे की हॉस्टेल मधील कोणी आजारी

असेल तर श्री. व सौ. बर्वे पतीपत्नी त्याची शुश्रुषा आपल्या मुलासारखी काळजी घेऊन करत. हॉस्टेलमधून अधून मधून चक्कर मारीत. त्यावेळी ते 'मूड'मधे असतील ते आम्हा सर्वांशी मोकळेपणाने गप्पा मारत व आमच्या सर्व प्रश्नाना व्यवस्थित उत्तरे देत. त्यातून त्याना आमच्याविषयी वाटणारी कळकळ जाणवत असे.

## अभ्यासाव्यतिरिक्त

हॉस्टेलमधे रहाणारे आम्ही सर्व गांवाबाहेर निर्जन जागी असल्याने बाहेरच्या जगाशी आमचा संपर्क तुटलेला होता. त्यावेळी Open Auditorium (उघड्या सभागृहात?) रोज पांच सहा दैनिके लाकडी स्टँडवर एकेका लाकडी पट्टीने जखडून[15] ठेवीत असत. त्यामुळे आम्हा काहीजणांचा रोज सकाळी उभे राहून ती वर्तमानपत्रे तेथे वाचण्याचा कार्यक्रम असे. त्याच काळात 'संयुक्त महाराष्ट्र'च्या चळवळीची धामधूम व निवडणुका चालू असताना तर तेथे सकाळी विद्यार्थ्यांचा घोळका असायचा.

क्लासेस व अभ्यास झाल्यावर करमणुकीची काहीच साधने नव्हती. साधा रेडिओ पण. त्यामुळे काही जण क्रिकेट, फुटबॉल (Soccer) सारखे खेळ खेळायचे. आम्हा मित्रांत रिंग टेनिस हा अटीतटीने खेळायचा आमचा खेळ. खेळण्याची पद्धत व कोर्ट बॅडमिंटनसारखेच. फक्त रॅकेट व शटल ऐवजी साधारण ८ इंच व्यासाची रबरी रिंग वापरायची एवढाच फरक. काहीजण फिरायला जायचे. त्यातले काही त्या निमित्ताने म्हणून विलिंग्डन कॉलेजवर (त्यांचे तेथे मुलींचे हॉस्टेल असल्याने) पोरीबाळी पहायला जात. त्याचप्रमाणे एखाद्याच्या खोलीत दाटीदाटीने बसून तासन् तास गाणी बजावणी, गप्पाष्टक वगैरे सारख्या गोष्टी नेहमी चालत. त्याला 'तबला' टाकणे ही संज्ञा.

दर बुधवारी संध्याकाळी आठ ते नऊपर्यंत 'अमीन सयानी'चा 'बिनाका गीतमाला' हा आम्हा सर्वांच्यात अत्यंत आवडीचा कार्यक्रम. त्यात दर आठवड्यातील हिंदी सिनेमातील त्यांच्या लोकप्रियतेनुसार गाणी सादर करत. फक्त 'नातू'च्या हॉटेलात रेडिओ असल्याने जेवण लवकर आटोपून तेथे ऐकण्यासाठी आठ वाजण्यापूर्वी पोचायची धडपड व तेथे जातायेता त्यावर उलटसुलट चर्चा व वादावादी. काहीजण इलेक्ट्रीकल लॅबमध्ये तेथे रेडिओ असल्याने तो ऐकायला चोरून जात असत असे ऐकले होते.

त्या काळात ऑफिसेस, बँका, शाळा, कॉलेजेस वगैरे सर्व शनिवारी अर्धा दिवस उघडी असत. त्याला आमच्या कॉलेजचा अपवाद असल्याचे आम्हाला कौतुक. Every weekend was two days long. त्यामुळे अभ्यास वगैरे आटोपून एखाद्या दिवशी सांगलीची चक्कर हमखास ठरलेली. त्यादिवशी 'माणसांत' आल्यासारखे वाटायचे. गांवात नुसतेच भटकायचे, पैशाची नेहमीच 'कडकी' (हा त्यावेळचा प्रचलित शब्द 'चणचण' या अर्थाने) असल्याने किरकोळ खरेदी, विंडो शॉपिंग (Window shopping) वगैरे आटोपून एखाद्या हॉटेलात खाऊन गाडीने परत. ज्याना हे आगगाडीच्या वेळेचे बंधन नको असेल ती मुले तासाला एक आणा देऊन भाड्याची सायकल घेऊन रमत गमत परत येत.

त्यावेळी 'लॉर्डस् हेअर कटिंग सलून' नांवाचे केस कापण्याचे दुकान निघाले होते. सांगलीच्या मानाने एकदम 'पॉश'. त्याला महिन्यातून एकदा भेट. त्यावेळी तेथे कॉलेजातील एक दोघे हमखास भेटायचे. तसेच महिन्यातून एखादा हिंदी मराठी सिनेमा पहाण्याचा कार्यक्रम असे. (त्यावेळी सिनेमाचे फक्त तीन दर - पाच आणे, साडेदहा आणे व सव्वा रुपया) काही शौकीन मुले दर आठवड्याला सिनेमा पहायची. यावरून एक प्रसंग आठवला. नूतन व राज कपूरचा 'अनाडी' आम्हाला अतिशय आवडलेला सिनेमा. त्याचा पहिला खेळ 'सदासुख' थेटरमधे दुपारी ३-१/२ वाजता होता. तो पहायला आमच्यातला एक जण गेला. तो सिनेमा पाहून इतका भारावून गेला की त्यानंतर परत तिकीट काढून त्याने साडेसहाचा खेळ पाहिला. यावर कडी म्हणजे त्यानेही समाधान न झाल्याने या पठ्ठ्याने साडेनवाचा तिसरा खेळ पाहून रात्री बेरात्री परत होस्टेलवर आला.

असो. अशा रीतीने आमचे पहिले वर्ष तेथे सुखात गेले व आम्ही आनंदात राहिलो. पास झाल्याचे व्ही. ए. जोशी सरांच्या सहीचे पत्र पान ७ वर आहे. काहीजण नापास झाल्याने त्यांची अनुपस्थिती दुसऱ्या वर्षी जाणवली.

[15] त्यामुळे ती बाहेर काढता येत नसत.

दुसऱ्या वर्षापासून आम्ही जरी एकदम नव्याकोऱ्या हॉस्टेलमधे रहायला गेलो तरी जेव्हा वालचंद कॉलेजची कधी आठवण येते किंवा बोलण्यात तो विषय आला तर सर्वात प्रथम जुन्या हॉस्टेलमधे काढलेले पहिले वर्षच आठवते.

### डेवलपमेंट ब्लॉक्स (१९)

उन्हाळ्याची सुटी संपवून परत येईपर्यंत नव्या हॉस्टेलचे (त्याचे नामकरण **डेवलपमेंट ब्लॉक्स)** बांधकाम पुरे होऊन आम्ही तेथे रहायला गेलो. सिमेंट काँक्रीटच्या प्रत्तेकी तीन मजली दोन इमारती. त्यांची D1 व D2 ही नांवे[16]. प्रशस्त खोल्या व व्हरांडा. मोठाली खिडकी. प्रत्तेक मजल्यावर संडास, बाथरूम्स व तोंड धुवायला वॉश बेसिन्स. जुन्या हॉस्टेलच्या तुलनेने हे पंचतारांकित (Five Star) म्हणावे असे. खोलीत दोन टेबले, खुर्च्या, बिछाने, एक छोटे कपाट. सारे काही नवे कोरे.

Besides, there were two small wooden book stands/cases and table lamps in each room. The base and stem of the lamps were made on wood turning lathes. What I heard about these items that they all were made in the Workshop by the students as assignments or 'submissions' in the carpentry department. They served their function beautifully. What a brilliant and innovative idea!

*आणि दुसरा खास 'सांगली/कोल्हापुरी टच' (Touch) म्हणजे दाराजवळ जमिनीच्या लेव्हलवर भिंतीत एक छोटे चौकोनी भोक (opening) होते व ते उघड/झाक करण्यासाठी त्याला आतून बाहेरून दोन दरवाजे. का तर जे विद्यार्थी रोज ताजे सकाळी दूध पिणारे असतील तर त्यांनी दुधाचे भांडे मधल्या पोकळीत रात्री ठेवून आतला दरवाजा बंद करायचा. पहाटे गवळी येऊन बाहेरचा दरवाजा उघडून भांड्यात दूध घालून बाहेरचा दरवाजा बंद करत असे. हे का तर मुलांना पहाटे उठायला लागून त्यांची झोपमोड होऊ नये म्हणून.* ***रोज सकाळी दूध पिणाऱ्यान्ची केवढी काळजी! अख्ख्या जगात अशी सोय इतर कोठेही नसेल.*** असो.

आता खोल्या व समोरचा व्हरांडा प्रशस्त असल्याने बरेचजणांनी एकत्र येऊन 'तबला टाकण्या'ची[17] टाकण्याची सोय झाली.

### मेस (२०) (Mess)

जेवण्यासाठीही हॉस्टेलच्या समोरच एक भलामोठा प्रशस्त हॉल. त्यात आमच्या पाच किंवा सहा 'मेसेस'. त्यातले एक (वा दोन?) मांसाहारी व बाकीचे शाकाहारी. प्रत्तेक 'मेस'चे अलग स्वयंपाकघर व वेगळे आचारी व वाढपे. (त्यांची सर्व साहित्य व साधनसामुग्री कॉलेजने पुरवलेली.) कोठला मेस निवडावा याला सर्वांना मुभा. हे मेस चालवण्याची पद्धत मात्र अतिशय आगळी व नाविन्यपूर्ण असल्याने ती सविस्तर लिहायला हवी. प्रत्तेक महीन्याचा वेगळा सेक्रेटरी त्यात्या मेसच्या मेंबर्समधूनच मेंबर्स निवडत. मेसची जबाबदारी त्या महिन्यापुरती त्याची. दर शनिवारी आचाऱ्याला घेऊन सांगलीला 'गोरे बंधू' यांच्या दुकानात जाऊन त्या आठवड्याच्या या दोघांनी ठरवलेल्या 'मेन्यू'प्रमाणे त्याला लागणाऱ्या सर्व वस्तूंची ऑर्डर द्यायची. त्याप्रमाणे 'गोरे बंधू' सर्व माल घरपोंच ('मेस'पोंच?) पाठवत व सर्व 'बिले' रेक्टर बर्वे सरांच्याकडे. तो कोठीत (Store room) ठेवण्याची व त्याचप्रमाणे त्यातून रोज सकाळी प्रत्तेक दिवसाचा शिधा आचाऱ्याला देण्याची जबाबदारी सेक्रेटरीची कारण त्याच्याकडे कोठीच्या किल्ल्या असत. त्याचप्रमाणे रविवारच्या 'फीस्ट'चा पदार्थ किंवा एखादा रसिक 'खवय्या' असेल (किंवा त्याला लहर आली) तर दर बुधवारी रात्री 'चेंज' म्हणून बटाटा वडा, भजी वगैरे तोच ठरवी. कधी कुणाला उशिरा जेवायचे असेल तर आधी सांगितले तर त्याच्या जेवणाचे ताट भरून व झाकून ठेवत असत. प्रत्तेक महिन्याचा प्रत्तेक मेसचा सर्व खर्च त्यात्या मेसच्या मेम्बरात

---

[16] D-3 व D-4 यांचे बांधकाम दुसऱ्या वर्षाच्या अखेरीस पुरे झाले.

[17] हा खास 'वालचन्द'चा शब्द

समप्रमाणात भागून प्रत्तेक महिन्याचे 'बिल' बर्वेसर ठरवत व त्याप्रमाणे आम्ही ती रक्कम त्याना द्यायची. अशी पारदर्शी व लोकशाही पद्धत. त्यामुळे आम्ही जसे खाऊ तसे बिल असल्याने दर महिन्याला ते नेहमी खाली वर होई. असो. हे मेस पुराण पुरे.

या दोहोंच्या संदर्भात एक घटना आठवली. हॉस्टेल व मेसच्यामधे बरीच खालीवर (uneven) मोकळी जागा एकसारखी (level) करायची होती. पण बर्वेसरांनी आठ दहा मजुरांना कुदळी, फावडी, घमेली देऊन त्या कामाला लावले. हे काम बरेच दिवस चालले होते[18]. मशिनरीचा उपयोग करून ते काम आठवड्याभरात झाले असते. याबद्दल त्याना विचारले असता ते म्हणाले 'ते मलाही माहित आहे पण या कामाची काही निकड नसल्याने ते काम या मजुरांनी केल्याने त्याना काही महिन्यांचा रोजगार मिळाला ना?' यावर आमच्याकडे काही उत्तर नव्हते.

## दुसऱ्या व तिसऱ्या वर्षातील आठवणी

दुसरे वर्ष उजाडले. पहिल्या वर्षाची आणि कॉलेजची नवलाई आता संपली होती. आता आम्ही सर्व या कॉलेज जीवनास रुळलो गेल्याने आमचे व सर्व सरांचे संबंध थोडे जवळचे झाले. आम्ही निवडलेल्या शाखेप्रमाणे आमचे अभ्यासक्रम आणि वर्ग वेगळे झाले व आपापल्या विषयांच्या अभ्यासास सुरवात झाली. असे जरी असले तरी त्याव्यतिरिक्त फावल्या वेळात आमच्या इतर उद्योगांना उधाण आले होते.

• लवकरच जनरल सेक्रेटरी, गॅदरिंग, विविध खेळ, वार्षिक (मासिक?) वगैरेच्या पदासाठी निवडणुकीचे वारे सुरू झाले. मित्रांच्या आग्रहाने मराठी विभागाच्या मासिकाच्या सेक्रेटरी पदासाठी उभा राहिलो. त्यावेळी त्यासाठी हँडबिले छापून घेण्याचे खूळ (Fad) होते. ती 'चावी'[19] मलाही बसली. दोनएक रुपयांना १०० मिळायची. ती छापून घेतली. (पान १८ पहा. माझ्या विरोधकाला ५९ तर मला ५८ मते पडली. निवडणूक हरलो. पुढच्या वर्षी मात्र बहुमताने निवडून आलो. मीच संपादक असल्याने त्यात माझी एक कविता[20] छापली. (पान १९ पहा.)

• २६ जानेवारीचा प्रजासत्ताक दिवस हा 'हॉस्टेल डे' (Hostel Day) म्हणून आमच्या कॉलेजवर मोठ्या धुमधडाक्याने साजरा होत असे. (वातावरण निर्मितीसाठी?) दिवसाची सुरवात संगीताने सुरु होई. सकाळी सहा ते आठपर्यंत कॉलेजच्या ध्वनिवर्धकावर (Loudspeaker) 'अमर भूपाळी' सिनेमातील जयराम शिलेदाराची गाणी व आशा भोसलेची नाट्यगीते[21] कॉलेजच्या आवारात व्यवस्थित ऐकू येत. सकाळच्या मुख्य पाहुण्याच्या हस्ते झेंडावंदनानंतर दिवसभर खेळांच्या स्पर्धा चालायच्या. त्या दिवसाची सांगता रात्रीच्या सहभोजनाने (Banquet). त्यावेळी त्याकरता सर्व उपस्थितांकरता 'ग्लोब'जवळच्या मोकळया जागेत उघड्यावर टेबले, वर टेबलक्लॉथ आणि खुर्च्या व्यवस्थित मांडलेल्या असायच्या. जेवण व वाढणे मेसमधील सर्व कर्मचारी करत. अर्थात ही सारी व्यवस्था व त्याची देखरेख नेहमीप्रमाणे बर्वेसरांच्या अंमलाखाली. त्यादिवशी मात्र आम्ही सारे जरा बऱ्यापेकी (Decent) कपडे घालत असू. जेवणाला पालक किंवा दोन मित्राना बोलावता येत असे. (काहीजण 'भाव' मारायला विलिंग्डन कॉलेजमधील मुलीनाही बोलावत.) या सहभोजनाला सर्व शिक्षकवर्ग, पालक, मित्र व इतर पाहुणे मोठ्या संख्येने उपस्थित असायचे. गप्पागोष्टी, एकमेकांची चेष्टामस्करी व आग्रह करीत जेवण आरामात होई.

• कॉलेज जीवनातले दर वर्षीचे 'गॅदरिंग' आमच्याही कॉलेजात उघड्या सभागृहात होत असे. ते दोन दिवस चालायचे त्याकरता समोरच्या मोकळ्या पटांगणात प्रेक्षकांना बसण्यासाठी खुर्च्यांची मांडलेल्या असत. पहिल्या रात्री करमणुकीचा कार्याक्रम व दुसऱ्या रात्री तीन अंकी नाटक. <u>त्याची उल्लेखनीय बाब म्हणजे आमच्या</u>

[18] अखेरीस अगदी शेवटचा उंचवटा उखडल्यावर काम पुरे झाल्याची पावती आम्ही काही विद्यार्थ्यांनी त्यांना टाळया वाजवून दिली.
[19] हादेखील खास 'वालचन्द'चा शब्द
[20] ही कविता उन्हाळयाच्या दिवसात रविवारी दुपारचे जेवण आटोपून हॉस्टेलमध्ये बिछान्यावर पडलो असताना सुचलेली.
[21] कॉलेजकडे फक्त याच रेकॉर्डस् असाव्यात असे मला वाटते.

कॉलेजात मुली नसल्याने सर्व स्त्रियांच्या भूमिका मुलेच करत. नाटक बसविण्यात पुढाकार मेकॅनिकलचे कानिटकर व हेडक्लर्क नेने[22] या दोघांचा. नेने 'बालगंधर्वां'च्या पठडीतले. त्यामुळे ते सर्व 'स्त्रीपार्टी'ला स्त्रियांच्या सारखे उभे कसे रहावे, चालावे कसे, बोलावे कसे वगैरे हे सर्व शिकवण्यात त्यांचा हातखंडा. त्यामुळे आमच्या कॉलेजचे हे एक मोठे वैशिष्ठ्य होते. तिसऱ्या वर्षी 'तुझे आहे तुझेपाशी'चा (त्यात बरीच स्त्री पात्रे आहेत) प्रयोग दृष्ट लागावी असा जमला होता.

• घडलेली एक अकल्पित घटना: औंधच्या राजघराण्यातील 'पंत' हा आमच्या कॉलेजातील एक विद्यार्थी. तो एके दिवशी अचानक अत्यवस्थ[23] झाल्याने त्याला मिरजेच्या रुग्णालयात ताबडतोब दाखल केले. दुर्दैवाने त्याचे दुसऱ्या दिवशी निधन झाले. आम्हा सर्वांना हा अनपेक्षित असा धक्काच बसला. 'स्टेशन वॅगन'मधून त्याचे कलेवर औंधला नेण्यापूर्वी कॉलेजवर काही मिनिटे आणले होते व त्याच्या अंत्यदर्शनाला मी गेलो होतो.

• कॉलेजमधील दहा बारा पारशी विद्यार्थ्यांची तऱ्हाच न्यारी. ते कॉलेजात असून नसल्यासारखे. D1च्या तिसऱ्या मजल्यावरील एका 'विंग'मध्ये सर्वांच्या खोल्या. रोजच्या जेवणाखाण्याला कॉलेजच्या बाहेर 'नातूं'चे हॉटेल असलेल्या इमारतीत. तिकडे येण्याजाण्यासाठी प्रत्तेकाकडे 'स्पोर्ट्स' सायकल. ते नेहमी आपल्याच कळपात रहात व इतरांच्यात मिसळणे नाहीच. कॉलेजच्या गॅदरिंगमध्ये ते एखादा पाश्चात्य किंवा त्या धर्तीचा कार्यक्रम करीत.

• सांगलीपासून ३५ मैलावर असलेले बत्तीस शिराळे[24] हे खेडेगाव तेथल्या 'नागपंचमी'साठी प्रसिद्ध. शंकराच्या गळयाभोवती नाग असल्याने नागाला देव मानतात. म्हणून त्याची नागपंचमीला पूजा करण्याची पद्धत आहे. त्यादिवशी तेथील रहिवासी पकडलेल्या नाग किंवा दहाफडी नागांची (Cobras and King Cobras) पूजा करून त्याना दिवसभर मोठ्या कुशलतेने खेळवीत व दुसऱ्या दिवशी पुन्हा रानात सोडून देत. ते पहायला "ही" (खूप) गर्दी. त्यादिवशी तिकडे जायची आमच्यात टूम निघाली. ते पहायला आम्ही (अति?) उत्साही आठ दहाजण भाड्याने सायकली घेऊन तेथे गेलो. तेथील जत्रा व नागांचे खेळ पहात सारा दिवस तेथे मोठा मजेत व आनंदात घालवला. तेवढ्यात एके ठिकाणी नाग नाही पण आठ दहा फूट लांबीची 'धामण' (बिनविषारी साप) एकाने पकडली होती. ती आम्हा सर्वांनी उचलून धरून एक आठवण म्हणून आमचा फोटो काढला. (पान २० पहा.) संध्याकाळी परत आल्यावर इतके अंतर सायकलने जाण्याची सवय नसल्याने पाय व पोटऱ्या नंतर चारपाच दिवस चांगल्याच दुखत होत्या.

• गणित, Mechanics of Structures, Theory of Structures यासारख्या विषयांच्या परीक्षेत १२ प्रश्नापैकी कोठलेही ८ सोडवावे लागत. उत्तर बरोबर असेल तर १२ मार्क्स नाहीतर भोपळा. त्यामुळे आम्हाला मार्क्स नेहमी १२च्या पाढ्यात मिळत. आमच्यातील 'सावरकर' हा गणितात 'दादा'. दुसऱ्या वर्षाच्या परीक्षेत ३ तासांचा पेपर १ तासात संपवून बाहेर आला. त्याला नंतर विचारल्यावर तो म्हणाला 'एका तासात मी बारा प्रश्न सोडवले व खाली पुस्ती जोडली की यापैकी कोठलेही आठ तपासा. मग तेथेच बसण्याचा कंटाळा आला म्हणून बाहेर पडलो'. त्याला गणितात १०० मार्क्स मिळाले.

मनाच्या पोतडीत बऱ्याच आठवणीं आहेत तरीपण येथेच थांबतो.

अशा रीतीने तिसरे वर्ष संपले. अंतिम परीक्षा पार पडल्यावर त्यानंतरच्या आठवड्यात प्रॅक्टीकल्स. ती जसजशी संपत आली तसतसे हॉस्टेलमधील सगेसोयरे आपापल्या गावी जाण्याकरता चंबूगबाळे आवरून परतू लागले व हॉस्टेल रिकामे, रिते होऊ लागले. तसाच मीपण त्या तीन वर्षांतील सर्व मित्रांचा व या **"गरीब पण घरगुती कॉलेजचा"** ऋणानुबंध संपल्याने दु:खद अंत:करणाने **'या आठवणींची शिदोरी'** बरोबर घेऊन बाहेर पडलो.

---

[22] स्वभावाने अतिशय चांगले. उंचेपुरे, गोरेपान, भव्य देहयष्टी, त्यामुळे की काय ते डुलत डुलत चालत.
[23] त्याला Brain Hemorrhage झाल्याचे निदान नंतर कळले.
[24] अधिक माहितीसाठी http://www.discoveredindia.com/maharashtra/fairs-and-festivals-in-maharashtra/festivals/snake-festival.htm

**मागे वळून पहाताना**

कॉलेज संपले. भाळावर बी.इ. (सिव्हिल) झाल्याचा टिळा लागला खरा पण मागे वळून पाहताना मनात कधी प्रश्न पडतो की त्या तीन वर्षात कॉलेजने काय दिले? त्या शिक्षणाचा पुढे वैयक्तिक व व्यावसायिक आयुष्यात उपयोग/फायदा झाला का?

त्यावर विचार केला म्हणजे असे वाटते की लहानपणापासून इमारती कशा बांधतात/उभ्या रहातात याचे मला कुतूहल (औत्सुक्य म्हणा) होते. त्यामुळे कोठे बांधकाम चालले असेल तर ते उत्सुकतेने मी पहात राही. दुसरी गोष्ट. सांगली कोल्हापूर या परिसरातच कायम वाढल्याने तेच माझे जग होते. कधी याबाहेर न गेल्याने बाहेरच्या जगाशी जो संबंध आला तो केवळ वर्तमानपत्रे व पुस्तकांच्या वाचनामुळे आला तेवढाच. तसेच कनिष्ट मध्यम वर्गातून वर आल्याने शिक्षण संपल्यावर चांगली नोकरी मिळवणे व स्वतंत्रपणे आयुष्यात स्थिरावणे हे माझ्या सारख्यांचे ध्येय असायचे. त्यावेळी इंजिनियर्सना मागणी होती.त्यांचा पगारही चांगला असल्याने आमच्या आटोक्यात असणारा एकच मार्ग (सायन्सची आवड होती म्हणून) म्हणजे इंजिनियर होणे.

आता व्यावसायिक आयुष्याविषयी. कॉलेजात असताना स्थापत्यशास्त्र किती विस्तीर्ण व विविध आहे याचे ज्ञान मिळाले. त्यातील प्रत्तेक उपशाखाही स्वतंत्र शास्त्र आहे हे समजले, त्याची जुजुबी माहिती मिळाली. उदा. Besides Structural Engineering, Water Supply, Sanitary Engineering, Tunnels, Bridges, Irrigation, Roads and Rail Road Engineering, Dams, Mining, Foundations, - this list can go on. विशेषेकरून माझ्या आवडीच्या Structural Engineering क्षेत्रात Mechanics and Structures, Theory of Structures, Foundation Design, Steel and Concrete Design, Geology, Engineering Drafting वगैरे विषयांची जवळून ओळख झाली, बरीच माहिती मिळाली. अर्थात् हे ज्ञान पुस्तकी होते हे खरे. पण त्यामुळे माझ्या क्षेत्रात प्रत्यक्ष कामाला सुरवात करताना (व केल्यावर) त्याचा 'पाया' (base/foundation) म्हणून नक्कीच उपयोग झाला.


त्याप्रमाणे इंजिनियरिंगची पदवी मिळाल्यावर आयुष्यात पुढे जरी श्रीमंत झालो नाही तरी वैयक्तिक आयुष्यात संसारिक जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडण्यात अडचण आली नाही किंवा खाण्यापिण्याची, रहाण्याची कधी ददात पडली नाही. त्यादृष्टीने वैयक्तिक आयुष्य सुखात गेले.

तेव्हा मीच उपस्थित केलेल्या प्रश्नाचे उत्तर म्हणजे की वालचंद कॉलेजला जाण्याचा उत्तरायुष्यात खूप उपयोग/फायदा झाला. त्याचप्रमाणे तो तीन वर्षांचा काळ सुखाचा गेला[25], नवीन मित्र जोडले, काहींची मैत्री अजून टिकून आहे.

त्याबद्दल **'गरीब पण घरगुती कॉलेज'**चे व तेथील सर्व शिक्षकांचे मन:पूर्वक आभार मानतो.

`

[25] इंग्रजीमधे म्हणायचे झाले तर: It was a good ride and I had a ball.




निवडणुकीसाठी हँडबिल



# आज मनावरी उगा मळभ ये!

अरविंद गोरे
बी. इ. (सिव्हिल)

सन्ध्या न्हिची
रणरणारी
वेळ स्वस्थशी.
आजुबाजुला
नव्हती चाहुल,
नव्हता पदरव.
खिडकीमधुनि
डोकवणारी
लबाड, मिस्किल
सुलुक मंदशी.
नभहि मोकळें,
नव्हता ठिपका
शुभ्र ढगाचा
इवलासाहि.
अवकाशामधी
भरुन होता
निवान्त केवळ.

नव्हतें माझ्या
मनात कांहिच
गोड स्मृती
ना रम्य आठवणी.
नव्हतें मन
आनंदी वा
दुःखी, कष्टी.
कर्तव्याची
जागृत जाणिव
लुळी होउनि
हृद्संवेदन
आणिक
तरल भावना
होउन बोथट
झालेलें मन
शेवरीपरी
हलकें, फुलकें
रीतें रीकामें.



बत्तीस शिराळे येथे नागपंचमीला 'धामण' (अजगरासारखा मोठा व लांब बिनविषारी साप) धरून आम्ही उभे राहिलेले असतानाचा फोटो. (हा फोटो मोहन पटवर्धनच्या संग्रहातून)

आमची ओळख: डावीकडून दुसऱ्यापासून: राजे, सावरकर, पटवर्धन, कोटकर, (मागे) ओक, चौधरी, गोरे, साप पकडणारा

वालचंद कॉलेजमध्ये प्रवेश मिळाल्याचे पत्र मिळाले व ओघाने हॉस्टेलमधे रहाणे हे ठरून गेले. नांवावरून मोठ्या शेटजीचे कॉलेज दिसले. मुंबईची चाळटाईप होस्टेल्स पाहिल्याने त्यामुळे अपेक्षा उंचावल्या. या हॉस्टेलमध्ये अशी सुखवस्तू रहायला मिळणार यामुळे अपेक्षा वाढली. अर्थात् माझा वेष अंगावर शर्ट, पायजमा व पायांत चपला हाच होता. वॉर्डन ऑफिसमधून खोली नंबर मिळाला. सामान घेऊन आल्यावर पहातो तो हॉस्टेलची इमारत नव्हती. मातीच्या भिंतीवर पत्रे. प्रत्तेक खोलीत दोन खाटा, दोन टेबलखुर्च्या ठेवल्यावर दोघांना खोलीत वावरण्यास कसरत करावी लागे. खोलीला जवळ म्हणून 'प्रभात' म्हणून कंत्राटदाराची 'मेस' पकडली, जेवण बरे असायचे. न्याहारीसाठी लांब कुठे कँटीन होते. पण पहिल्या दिवशी समजले की 'इथे दूध स्वस्त आहे'. त्यामुळे ब्रेकफास्ट म्हणजे कोको घालून २ ग्लास दूध असे ठरवले. दूध तापवण्यासाठी 'कोऑपरेटीव' स्टोव्ह व दांड्याची अल्युमिनम पातेली आणली. त्यामुळे एकदा वापरल्यावर दुसऱ्या दिवशी दुधवाला येण्यापूर्वी आणण्याची जबाबदारी आली. जमिनीच्या लेव्हलला नळ असलेली टाकी होती. शेजारची माती घेऊन कशीबशी पातेली घासून तयार ठेवायची. अर्थात् हे सर्वांनाच करावे लागे. अपवाद 'नातूं'कडे ऑमलेट खाऊन येणाऱ्याचा व कँटीनला जाणाऱ्याचा.

आमच्यापैकी एक नेहमी दूध तापवून घेत असे. पण पातेली घासणाऱ्यामधे नसायचा. त्याने 'सिक्रेट' सांगितले ते असे. तो वापरलेली पातेली खोलीबाहेर ठेवायचा. त्याचा दोस्त कुत्रा चाटून साफ करायचा. हा गृहस्थ फक्त पाणी घालून धुवून वापरायचा! शेड[26]मध्ये शिरताना माठ व पाणी घेण्यासाठी भांडे दरवाजातच असे.

दुसरी एक गोष्ट संडासांची. शेडपासून थोडे लांब ओळीने चारपांच संडास होते. सकाळी लवकर जाणाऱ्याना काही अडचण नसायची. पण थोडे उशिरा उठणारे लोक येत तेव्हा गर्दी होई. तयार कोणी उशिर्लावानारा गेला की त्याला जागवण्यासाठी प्रथम गाणी म्हटली जात. नंतर छोटेसे खडे संडासाच्या पत्र्यावर मारले जात.

या सर्वापासून लांब पण खास स्कॉलर विद्यार्थ्यांच्याकरता एक 'बंगली'(८अ) होती. त्यात रहाणाऱ्या तिघांची नांवे आठवतात – साठे, महाबळ व बापट. या भाग्यवान लोकांचे कौतुक वाटायचे.

'तबला' टाकणे व 'गूळ' काढणे हे वाक्प्रचार खास 'वालचंद'मधले. आज निश्चितपणे यांचा उपयोग करणे शक्य होणार नाही. पण त्यावेळच्या वातावरणात यांची खास मजा असे. 'शेड'मधील वातावरणात तबला टाकण्याला खास महत्व होते. यु. ए. देसाईने ग्राउंडवर सर्वासमक्ष लोटांगण घालण्याचा सीन. ही कल्पना अशा तबला टाकण्यातूनच होती. रातोरात जाहिराती चिकटवून देसाई हा ग्राउंडवर काही चमत्कार करून दाखवणार आहे असे या जाहिरातबाजीचे स्वरूप होते.

आमच्यातील काही मित्रांनी परीक्षा जमणार नाही तेव्हा सबमिशन पूर्ण करू शकू असा हिशेब मांडला. रात्री मोठमोठ्याने गप्पा मारून त्रास देण्यापेक्षा शहरात जाऊन सिनेमा पहायचा. व गप्पा मारीत पायी चालत परत यायचे व सकाळी उशिरा उठायचे असा त्यांचा कार्यक्रम असे. त्यातील एक मला आठवते की अभ्यास 'सिरीयसली' होण्यासाठी आंघोळ बंद करत असे तर दुसरा एक पूर्ण केस काढून गुळगुळीत डोक्याने फिरे.

आमच्या सर्वामध्ये वेगळे दिसणारे पारशी विद्यार्थी होते. गोरेपान, उंच, फॅशनेबल कपड्यातील. त्यांची 'मेस'ही 'नातूं'च्या दुकानाशेजारी होती. ते काय जेवत असतील याची कल्पना त्यांचा ढेरपोट्या नोकर पाहून येई. 'रॅगिंग' हा प्रकार वालचंदमधे नव्हता. पण हे पारशी आपल्या ग्रुपमध्ये काही गंमती करत त्या कानावर येत.

[26] जुने हॉस्टेल

ब्रॉडगेज' चपला हा प्रकार वालचंदमधेच सांपडला. मुंबईला घेतलेली नवी चप्पल पाउस पडल्यावर वापरताना तुटली. त्यावेळी आठ आण्यात किंवा एका रुपयात मिळणारी चप्पल बहुगुणी आहे हे सिद्ध झाले व क्लासरूममधेही पावसाळ्यात जाऊ लागली.

पहिल्या महिन्यानंतर 'मेस'चे बिल ३० रुपये आल्याने बऱ्याच जणांनी विलिंग्डन कॉलेजची मेस सुरु केली. जेवण चांगले असे पण पावसाळ्यात जाणे अवघड आणि तसे अंतरही बरेच असे.

'फुलराणी'सारखी मिरजेहून सांगलीला जाणारी ही आगगाडी वालचंदच्या दिवसातील करमणुकीचा भाग होती. सिनेमा पहायला जाणे तसेच 'कंदी'कडची मिठाई खाणे यास ती फार उपयोगी होती.

## Memories of Walchand College

Mangesh Nadkarni BE(Elec) 1956-1959 [Contact: mangeshnadkarni2002@yahoo.co.in]

I very fondly remember two very colourful characters of our batch. Javdekar and U.I.Desai. Not a day would pass without some very interesting arguments between these two. I remember they used to take bets on everything they argued about. On one particular occasion, Desai had to roll in mud near the old hostel which he did and won the bet.

Desai was a great fan of Shakila ( Bollywood actress) and if you were trying to wake him he would brush you away and tell that he is dreaming about Shakila and after you give up the dream would continue!

I also remember my friend Vinay Bhende would go for long run before the Sunday feast to develop healthy appetite and if he came late we all used to tell him that most of the sweet dish got already consumed and he would be almost in tears.

## *वालचंद कॉलेजच्या आठवणी*

*मोहन पटवर्धन BE(Elec) 1956-1959 (Contact: mohanpat38@gmail.com)*

*१९५६ साली इंजीनियरिंग कॉलेज प्रवेश सध्यापेक्षा खूपच सोपा होता. साधारण ६० टक्क्यापेक्षा जास्त गुण मिळाले, जोडीला ड्रॉइंगच्या परीक्षा आणि एन्.सी. सी. (NCC) ट्रेनिंग असेल तर त्याकरता अधिक गुण मिळत. सर्वात जास्त मागणी मेटॅलर्जिला. पण प्रवेशासाठी त्याला इंटर सायन्सला ७० टक्क्याहून अधिक मार्क्स लागायचे. त्याखालोखाल टेलीकम्युनिकेशन, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल व सिव्हिल असा क्रम होता. मला पुण्यामधे सिव्हिलमधे प्रवेश मिळत होता; पण इलेक्ट्रिकलला जाण्याचा माझा हट्ट. त्यामुळे रिटायर्ड वडिलांना मी मोठा भुर्दंड दिला व वालचंद कॉलेजमधे प्रवेश घेतला.*

*या कॉलेजने मला घडवले व मुख्य म्हणजे माझ्यासारख्या कृष व्यक्तिला जीवदान दिले. 'ओल्ड हॉस्टेल' म्हणजे पूर्वीच्या मिलिटरी बऱ्याक्स असाव्यात. एक विटाच्या भिंती व त्यामुळे सर्वजण एकाच खोलीत असल्यासारखे वाटत असे. माझा पहिल्या वर्षीचा पार्टनर फडके होता. आम्ही दोघे दररोज सकाळी २ मापे दूध व त्यात २ अंडी घालून ते उकळून पीत असू. त्यानंतर लगेच जवळच्या 'जिम'[27] मधे (१०अ) जाऊन उठाबशा आणि 'वेट लिफ्टिंग' करत असू. हे चालु केल्यामुळे माझे वजन थोड्याच दिवसांत ९० पौंडावरून १२० पौंड झाले. अर्थात् त्यामुळे सर्वेईन्गच्या पहिल्या तासाला मागच्या बाकावर बसून डुलक्या खात असे. या 'जिम'मधे एक 'सीनियर' खाम्बेटे येत असे. त्या पठ्ठ्याने पैज मारुन १२५ गुलाबजांब खाल्ले होते. 'प्रभात' मेस जवळच होती. तेथे भाकरी, पिठले व सोबत वाटीभरून लोणी खायला फारच मज्जा येत असे. दर बुधवारी रात्री 'चेंज' व रविवारी सकाळी फीस्ट असायची. रविवारी रात्रीचे जेवण नसायचे. तेव्हा रेल्वेने संध्याकाळी सांगलीला जाऊन 'भगवानदास'ची कंदी आणि प्रभात टॉकीजमधे ५ आण्यामध्ये जुने सिनेमे पहात असू. परत येताना अर्थात् चालतच येत असू. बरोबर अर्थात नेहमीची गँग 'वश्या' (वसंत जोशी), 'किश्या', 'म्हशा (म्हसकर) व कानिटकर असत. होस्टेलवर परत यायला रात्रीचा १ वाजत असे. एकंदरीत अभ्यासाखेरीज सर्व मज्जाच मजा.*

*अप्लाइड मशीनचे सर शर्मा हे मला व 'अमलानी'ला गॅदरिंगमधे 'लैला व मजनूचा' रोल देणार होते. कारण प्रोग्रॅम कॅंसल झाल्याने वाचलो. त्याचप्रमाणे 'उठ साकी दे भरोनी वारुणीचा एक प्याला' यातूनही.*

*खोलीमधे खूप उकडत असे. त्यामुळे थोडा उन्हाळा चालू झाला की अर्ध्या मैलावरच्या विहिरीत पोहायला जात असू व येताना शेंगांची झाडे उपटून शेंगा खात असु.*

*कॉलेजच्या क्रिकेट टिमबरोबर मॅच पहायला व त्यांना प्रोत्साहन द्यायला सगळीकडे जात असू. आमच्या क्रिकेट टीममधे मला आठवणारे खेळाडू आमच्याच बॅचमधले ते म्हणजे धडाकेबाज बॅट्समन कुर्लेकर, 'ओपनिंग'ला गायतोंडे व 'मिडल् ऑर्डर'ला प्रधान. नेहमी कुर्लेकरच्या बॅटिंगवरच आमच्या सर्व आशा अवलंबून असायच्या. थेट कोल्हापुरपर्यंत दर दिवसाला दहा आणे देऊन भाड्याच्या सायकलने जाणे हा नित्याचाच भाग होता. प्रत्येकवेळी माझ्याबरोबर माझ्यासारखीच उनाड मंडळी असत.*

*'बर्वे'सर हॉस्टेलचे 'रेक्टर' असल्याने त्यांचे आम्हा सर्वांवर बारीक लक्ष असायचे व ते प्रत्येकाला नावाने ओळखत. साधा लेंगा व निळा शर्ट घालून ते कधीही हॉस्टेलवर गप्पा मारायला येत असत. परीक्षेच्या आधी येऊन पेपर कसे लिहावे, मुले काय चुका करतात वगेरे सांगत. कोणाची कसलीही अडचण असेल तर ते सोडवत असत.*

*बुधवारी रात्री. अमीन सयानीची बिनाका गीतमाला व कॅन्टीनमधे संयुक्त महाराष्ट्राच्या बातम्या हा नेहमीचा चर्चेचा विषय असे. विशेषत: बेळगांवचा कर्नाटकमधे समावेश बेळगांवकराना नको असल्याने. या कॅन्टीनमुळेच मला चहाची सवय लागली.*

*नवीन 'डी टाइप' (D Type) होस्टेलचे बांधकामाचे कंत्राट माझा पार्टनर फडकेचे वडील यांच्याकडे होते. त्यामुळे आम्ही बरेचवेळा त्याच्याबरोबर तेथे जात असे. अजून एक आठवण होते ती 'गझदर' नावाच्या*

[27] Gymnasium

*पारशी मुलाची. तो एकहि पिरीयड़ला न जाता रात्रभर बाहेर टेबल ठेऊन अभ्यास करत असे व नेहमी डिस्टींक्शनमधे येत असे. एवढा सगळा व्यायाम करुनसुद्धा 'एफ्.इ.'च्या (F.E. i.e. First Year Engineering) फायनलला 'प्रॅक्टिकल'च्या परीक्षेला मला 'फ्लू'चा ताप आला पण जोशीसरानी वर्कशॉपच्या प्रॅक्टिकलला मदत केल्यामुळे वाचलो.*

*असो. असे हे आमचे कॉलेज आणि त्याच्या आठवणी.*

## वालचंद कॉलेजातील सुखद आठवणींचे मोरपीस

**सुभाष सुखठणकर** BE(Elec) 1956-1959 (Contact:ssukthankar@yahoo.com)

कॉलेजच्या १९५८ सालच्या 'मॅगझीन'मधे अरविंद गोरेची "आठवणींचे मोरपीस" नांवाची एक छोटीशी कविता प्रसिद्ध झाली होती. मला आठवत असलेली त्याची सुरवात

*'आठवणींचे मोरपीस जे, जुन्या पुस्तकी दडलेले*
*नीबर गाली हळू फिरवावे, ----------------------'*

अशाच "आठवणींच्या पिसा"वर बसून माझे मन भूतकाळात - १९५६ म्हणजे जवळजवळ साठ वर्षापूर्वीच्या मे-जून महिन्यात दाखल झाले.

मुंबईतील एल्फिन्स्टन कॉलेजातून 'इंटर सायन्स'ला (Inter Science) पहिला वर्ग मिळाला व त्यामुळे 'वालचंद कॉलेज'मधे 'इलेक्ट्रिकल' शाखेत प्रवेश मिळाल्याने तेथे जायचे ठरले. त्याकाळी आगगाडीने कॉलेजला जायचे म्हणजे सव्यापसव्यच होते - प्रथम पुण्याला जायचे, तेथे गाडी बदलून मिरजेला व पुन्हा गाडी बदलून विश्रामबागला. आयुष्यातला हा पहिलाच 'लांबचा प्रवास' असल्याने माझ्यापेक्षा माझ्या आईलाच त्याची जास्त काळजी वाटत होती. सुदैवाने पुण्याच्या गाडीतच रेडकर नांवाचा दुसऱ्या वर्षातील (अनुभवी?) विद्यार्थी भेटल्याने दिलासा आला व त्याच्याबरोबर कॉलेजवर निर्विघ्नपणे पोचलो.

ॲडमिशनचे सोपस्कार सुरळीतपणे पार पडून 'जुन्या हॉस्टेल'च्या 'बी. ब्लॉक'मधे खोली मिळाली. अशोक गायतोंडे हा माझा सहनिवासी (room partner). गायतोंडे (पॉप्युलर नांव 'गायत्या') हा किंग जॉर्ज शाळेच्या क्रिकेट टीममधून आंतरशालेय सामन्यांत 'फास्ट बॉलर' म्हणून चमकला होता. उंचीने कमी असला तरी कॉलेज टीमचा तो आधारस्थंब बनला. 'मूर्ती छोटी पण कीर्ती बडी' अशी व्यक्ती. समोरच्या खोलीत पुण्याचा शेणोलीकर व इंदूरचा गोडबोले हे होते. दोघेही 'सिव्हील'चे. अगदी विशेष योगायोगाची सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे जवळजवळ ५० वर्षांनी २००५ मधे केरळ पहायला गेलो असताना कोचीनमध्ये गोडबोलेची अचानक गाठ पडली. मध्यप्रदेशात 'चीफ इंजीनीयर' या उच्च पदावर पोचून तो नुकताच सेवानिवृत्त झाला होता. ४०- ४५ वर्षांच्या कालखंडानंतर आम्ही एकमेकाना क्षणार्धात ओळखल्याने आम्हा दोघांच्या बायका आश्चर्यचकित झाल्या.

पहिल्या वर्षातील एक क्लेशदायक आठवण म्हणजे दोन महिन्यात मी काविळीमुळे खूपच आजारी पडलो. कॉलेजच्या डॉक्टरना बरोबर निदान न झाल्याने फारच सिरीयस झालो. गायतोंडे व अशोक पटवर्धन ("लंब्या पट्या") यांनी खूप शुश्रुषा केली पण बिछान्यावरून उठणेही अशक्य झाले. पटवर्धनाचे काका माझ्या वडिलांचे स्नेही असल्याने त्याने 'ट्रंक कॉल'[28] करून काकांना लगेच कळवले आणि त्यांनी माझ्या घरी. माझी आई व डॉक्टर असलेले काका ताबडतोब आले व त्यांनी मला मुंबईला लगेच नेले. संपूर्ण बरा होईपर्यंत ४० दिवस तेथे रहावे लागल्याने कांही विषयांचे बरेच क्लासेस बुडले. त्यामुळे तो अभ्यास भरून काढायला खूपच कष्ट घ्यावे लागले. या काळात 'गायत्या' व 'लंब्या पट्या' यांनी बरीच मदत केली. तसेच 'शर्मा'सर M. & S. (Materials and Structures) शिकवीत. त्यांनी मला बराच वेळ देऊन मार्गदर्शन केले. कावीळ कशामुळे झाली हे शेवटपर्यंत कळले नाही.

पहिल्या वर्षाची (F.E.) परीक्षा पार करून दुसऱ्या वर्षात पदार्पण केले आणि जुन्या हॉस्टेलमधून नव्याकोऱ्या हॉस्टेलमधे (Development Block D-2) खोली मिळाली. 'रूमपार्टनर' पुन्हा 'गायत्या' व शेजारच्या खोलीत गोरे व राजे ही जोडगोळी. दुसऱ्या बाजूला श्रीनिवास दिवेकर व साठे ही 'स्कॉलर' मंडळी. पुढे बेरडे व बडगेरी असल्याचे आठवते. 'जुन्या हॉस्टेल'मधून D-2[29] मधे जाणे हे Quantum Leap (हनुमंताचे उड्डाण) म्हणावे लागेल.

[28] त्यावेळी फोन असणे हे तुरळकच असल्याने Long Distance Call करण्याची हीच पद्धत प्रचलित होती.
[29] आता त्याचे नामांतर होऊन Bannerjee Hall of Residence असे लांबलचक A.C.C. (Associated Cement Companies) यांच्या सौजन्याने (खरे म्हणजे त्यांच्या देणगीमुळे) झाले आहे.

आधीच्या 'मेस'मधल्या 'पुना क्लब', नॅशनल क्लब' वगैरे सर्व क्लबांचे स्थलांतर Development Block च्या समोरील पटांगणाच्या पलीकडे सर्व सोयीसकट नव्याकोऱ्या 'मेस'मधे झाले.

दुसऱ्या वर्षाच्या विषयांमध्ये 'रेडीओ' व 'वायरलेस' या विषयांचा समावेश झाला आणि प्रो. राजू यांच्याशी संबंध आला. सुरवातीला त्यांची लेक्चर्स समजायला कठीण जायची पण लवकरच आमची सम (Wavelength) जुळली. आमच्या वर्गात मूलचंद चावला व जेकब टॉमस हे दोघेजण.

त्यावेळच्या एका सिनेमातील 'मुन्ना बडा प्यारा, मम्मिका दुलारा' हे गाणे अतिशय लोकप्रिय होते. चावलाने त्याचे "राजू बडा प्यारा, रेडीओका दुलारा' असे विडंबन (parody) करून कॉलेजच्या 'गॅदरिंग'ला "Fish Pond" म्हणून चालीत सादर केले. त्याला हशा व टाळयांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

जेकब याचे इंग्रजी फर्डे व तो उत्कृष्ट वक्ताही होता. पुढे तो 'जनरल मोटर्स'मधे (General Motors) महत्वाच्या उच्च पदावर होता असे सुभाष कीर्तनेकडून समजले.

D-2 ब्लॉकमधे शेजारचे गोरे व राजे यांनी खोली स्वच्छ व नीटनेटकी ठेवीत. पावसाळयात चिखल्याने माखलेल्या 'ब्रॉडगेज' चपलांनी खोलीची जमीन खराब होऊ नये म्हणून खोलीत येणाऱ्यानी चपला काढून प्रवेश करावा यासाठी दरवाजावर नम्र सूचना अशी होती: **"पादत्राणालंकारविरहित पदारविंदानी आत प्रवेशावे".**
राजे व गोरे या दोघांची कॉलेज सोडल्यावर अचानक दिल्लीला गाठ पडली. राजे त्यावेळी IBMमधे होता व तो बँकॉक वगैरेचा प्रवास करून आला होता. त्यानंतर बराच प्रयत्न केला तरी त्याची अजूनपर्यंत भेट झाली नाही व माहितीपण मिळाली नाही. अरविंद गोरेचा मात्र २ - ३ वर्षापूर्वी पुन्हा संपर्क झाला तो सुभाष कीर्तनेमुळे. अजुनतरी त्याचाशी फोन व इमेल या माध्यमातूनच संपर्क आहे पण प्रत्यक्ष भेटीची प्रबळ इच्छा आहे.
तिसऱ्या वर्षात इलेक्ट्रिकलचे प्रो. तिळवल्ली यांच्याकडून शिक्षण घेण्याची सुवर्णसंधी मिळाली हे मी माझे सद्भाग्य समजतो. या क्षेत्रातील उत्तम प्रोफेसर हा त्यांचा सार्थ परिचय होता. विशेषत: इलेक्ट्रिकल इंजिनियरिंगमधील E-3 हा अवघड विषय अत्यंत समर्थपणे शिकवणे खूप कौशल्याचे काम आहे. त्यांच्या शिकवण्याच्या शैलीने या कठीण विषयाचे बारकावे उत्तम तऱ्हेने समजले व नंतरच्या व्यावसायिक आयुष्यात (Professional career) चांगला उपयोग झाला. कॉलेज संपून नोकरीत असतानादेखील त्यांच्याशी बरीच वर्षे माझा पत्रव्यवहार होता. तसेच फाटकसर व कुलकर्णीसर हे दोघे इलेक्ट्रिकलचे शिक्षक चांगले शिकवीत व उत्तम मार्गदर्शन करीत.
या वर्षाच्या (२०१५) सुरवातीला १४ जानेवारीला कॉलेजात माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याला (Alumni Day) जायचा सुवर्णयोग आला. त्यानिमित्ताने दिवेकर, छत्रे, बडगेरी, साठे व मी असे आम्ही सर्वजन गेलो होतो. तेथे आमच्या बॅचचे पी. ए. कुलकर्णी ('पाक्या' हे आमच्या वेळचे त्याचे नाव) व शरद्चंद्र मालू यांची भेट झाली. हे दोघेही तेथेच प्रोफेसर होते. 'पीए'ने तर तेथेच शिकवायला सुरवात करून अखेर 'प्रिन्सिपाल' झाला हे भूषणास्पद आहे. त्या मेळाव्यात जुन्या आठवणींना उजाळा दिला. विद्यार्थीदशेतील D-2 ब्लॉकमधील आमची खोली बघता आली नाही. कारण त्या ब्लॉकचे आता 'मुलींच्या वसतिगृहा'त (Ladies Hostel) रुपांतर केल्याने बाल्कनीच्या पुढे भिंती उभारून त्याला आता तुरुंगाचे स्वरूप आल्याने मनाला अस्वस्थ करून गेले. 'कालाय तस्मै नम:" असेच म्हटले पाहिजे. दुसरे काय?

## माझी वालचंद कॉलेजची वाटचाल

दत्तात्रय भेंडे[30] BE(Civil)1961-1964 (Contact: dbse21@gmail.com)

आज मी जेव्हा गतजीवनाच्या पाऊलवाटेकडे मागे वळून बघतो तेव्हा पांच दशकामागे वालचंद कॉलेजमधील १९६१ ते १९६४ मधील तीन वर्षांच्या वास्तव्याची स्मृती अजुनी ताजी असल्याने त्यातील आठवणींची उजळणी मनात सुरु होते.

पहिली आठवण तर कॉलेजला पोचण्याआधीची. मुंबई ते सांगलीच्या प्रवास आणि इतरही अनपेक्षित अडचणींमुळे मी चिंताग्रस्त होतो. प्रवासाच्या आदल्या दिवशी मी 'बाँबे सेन्ट्रल' स्टेशनच्या कँटीनमधे जेवण घेतले. मनांत सगळे विचार दुसऱ्या दिवसाच्या प्रवासाचे. जेवण संपवून दुसऱ्या खोलीत जाऊन तोंड धुतले व तसाच बाहेर पडलो. मागून 'वेटर' धावत धावत बिल घेवून आला. तेव्हा झालेली माझी ओशाळवाणी परिस्थिती मी कसा विसरेन?

मिरजेला आल्यावर गाडी बदलून विश्रामबागला पहाटेच पोचलो. तेथून कॉलेजवर चालत गेलो. भल्या सकाळची वेळ असल्याने सगळा शुकशुकाट होता. माझ्या एका ओळखीच्या गृहस्थांनी प्रा. फाटकांची ओळख सांगितली होती. वाटले, आता वेळ आहे तर त्यांची भेट घ्यावी. कांही वेळाने एक 'प्यून' दृष्टीस पडला; त्याला विचारले. त्याने मला प्रा. फाटकांच्या घरी नेले. आम्ही दार ठोठावले. दार उघडले आणि माझ्या लक्षात आले की मी त्यांना झोपेतून उठवले! धरणी दुभंगून त्यात मी गडप व्हावे असेच मला त्याक्षणी वाटले. परंतु फाटकसर सुस्वभावी. त्यांनी मला काही तसे वाटू दिले नाही.

नंतर हॉस्टेल बघायला गेलो तेव्हा मात्र निराशा झाली. जुने वसतिगृह एकमजली लष्करी 'छावण्या'च होत्या. लहान खोली, त्यात विद्यार्थी. वर पत्रे. उन्हाळ्यात गरमीने हाल व्हायचे. मुंबईत विल्सन कॉलेजच्या चौपाटीवरच्या वसतिगृहातून (मॅकिकन हॉल) आल्याने ह्या जुन्या वसतिगृहातला अनुभव काही दिवस खूपच जाणवला. पण दुसऱ्या, तिसऱ्या वर्षात Development Blockमधे रहायला मिळणार ह्या विचाराने मनाची समजूत घातली.

त्या वसतिगृहात सर्व प्रकारच्या मुलांशी - पारशी, सिंधी व महाराष्ट्रीय - मैत्री जमली. पारशी मुलांसाठी त्यांची एक खास 'मेस' होती. त्याना मांसाहारी जेवण मिळायचे.आमची मेस शाकाहारी व स्वस्त! मिरजेला जाण्याऱ्या रस्त्यावर वाहतूक फारच कमी. त्या रस्त्यावर मी वानलेसवाडीपर्यन्त रोज संध्याकाळी चालायला जात असे. रस्त्यावर कधीकधी ऊस नेणाऱ्या बैलगाड्यांची वाहतूक असे. गाडीवाले बैलांना अफलातून शिव्या हासडत असत. त्याची आठवण आल्यावर आजही हसू येते.

पुस्तके, बॉयलर सूट व स्लाईडरूल घेणे महागडे होते. Faber Castellचा स्लाईडरूल मला परवडण्याजोगा असल्याने Aristo Studio स्लाईडरूल घेणाऱ्यांचा हेवा वाटायचा.

कॉलेजमध्ये काही नवीन शब्द ऐकिवात आले. उदाहरणार्थ - 'तबला टाकणे[31]', 'जीटी[32] मारणे' वगैरे. तिकडे जवळच सखाराम चांभार होता. परीक्षा होऊन हॉस्टेलवर आल्यावर सिंधी मुलांची आरडाओरड होत असे. 'सखारामको जल्दी बुलाव'! सुरवातीला मला मला त्याचा अर्थ कळेना पण नंतर लौकरच समजला.

दुसऱ्या वर्षी D-2 ब्लॉकमध्ये खोली मिळाली. खिडकीमधून बाहेर पाहिले की दूरपर्यंत पसरलेली शेते दिसायची व त्यातून धावणारी कोल्हापूरला जाणारी आगगाडी हे दृष्य अजून मनात घर करून आहे.

फाटकसर इलेक्ट्रिकल इंजिनियरिंग शिकवायचे. त्यांचा Fundamental Conceptsवर फार भर. Fitzgerald & Higginbotham यांचे पुस्तक त्यांनी आमचे 'टेक्स्ट बुक' म्हणून निवडले. तेमात्र बऱ्याच मुलांच्या

[30] १९७०च्या दशकात आम्ही कॅलीफोर्नियात असतानापासूनची आमची मैत्री आहे.
[31] गप्पांचा अड्डा - गप्पा मारायाला एकत्र जमणे
[32] Glass Tracing (G.T.) ड्रॉइंगची कॉपी करायला

*डोक्यावरून गेले. म्हणून त्यांना 'F&H' – Fantastic & Horrible हा 'फिशपाँड' दिला गेला होता. पी. ए. कुलकर्णीसर ('पाक') फार प्रभावी शिक्षक होते. त्यांचा अस्खलितपणा वाखाणण्याजोगा होता. ते जरी तरुण असले तरी ते एक उत्कृष्ट शिक्षक होते.*

*गणिताचे शिक्षक Dynamics व Differential Equations का शिकवायचे याचा तेव्हा मला कधीच पत्ता लागला नाही. Engineering Economics व Sanitary Engineering हे विषय मी नाईलाजानेच शिकलो. Mechanics & Structures (M&S)ला भाटेसरही अतिशय उत्कृष्ट शिक्षक. त्याचप्रमाणे डॉ. गोरेसर व डोईफोडेसर. जिऑलॉजीचे (Geology) साठेसर जबरदस्त होते. नेहमी फटफटीवरून येणारी त्यांची रुबाबदार मूर्ती अजुनी आठवते.*

*दरवर्षी मिरजेच्या दर्ग्यातील रात्रभर चालण्याऱ्या संगीत महोत्सवाला एकदाच गेलो होतो. त्यावेळी तेथे बरेच प्रसिद्ध कलाकार हजरी लावून गेले. असो.*

*अशी ही माझी वालचंद कॉलेजची वाटचाल!*

## माझ्या आठवणी, तसेच लिंबोणी प्रकरण

श्रीनिवास दिवेकर B.E.(Civil, Mech. and Elec.) 1954-1960 [Contact: sr_divekar@yahoo.com]

मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजमधून 'इंटर सायन्स' झाल्यावर जून १९५४ला तेव्हाच्या 'न्यू इंजिनियरिंग कॉलेज' मधे (नंतर त्याचे नांव बदलले गेले) दाखल झालो. त्यावेळी तेथे फक्त सिव्हिल शाखाच कार्यरत असल्याने त्याच वर्षी नव्याने सुरु केलेल्या FE[33](Civil)च्या तुकडीत प्रवेश मिळाला. इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल पदवीची माझी तीव्र इच्छा असल्याने एक दोन वर्षात इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल शाखा सुरु करतील अशी मला आशा होती. त्यावेळी पदवी अभ्यासक्रम ३ वर्षांचा होता व त्यातील पहिल्या वर्षात सर्व शाखांचा अभ्यासक्रम सारखाच असल्याने त्या दोन्ही शाखा सुरु झाल्यातर सिव्हिलची पदवी मिळाल्यावर दोनच वर्षात मेकॅनिकलची पदवी मिळू शके. तसेच दुसऱ्या वर्षात पुन्हा मेकॅनिकल व इलेक्ट्रिकलचा अभ्यासक्रम एकच असल्याने नंतर एका वर्षात इलेक्ट्रिकलची पदवी मिळू शके. म्हणजे पाच वर्षात दोन पदव्या व सहा वर्षात तिन्ही पदव्या मिळवता येत असत. सुदैवाने BE(Mech. & Elec.) होण्याची माझी इच्छा सफळ झाली.

कॉलेजवर आल्यावर मला "जुन्या हॉस्टेल"मध्ये खोली मिळाली. पहिल्यापासून मला व्यायामाची व रिंग टेनिस खेळण्याची आवड असल्याने तेथील व्यायामशाळेत जायला व त्याचप्रमाणे रिंग टेनिस खेळायला सुरवात केली व तो नेम मी पुढचे सहा वर्षे सलग चालू ठेवला. पहिल्या वर्षी माझा 'रूम पार्टनर' विठ्ठल वाटवे होता. अतिशय सुंदर अक्षर व उत्तम ड्रॉईंग हे त्याचे विशेष गुण. त्याचीपण माझ्यासारखीच इच्छा होती. पण बीई सिव्हिल झाल्यावर MPSC परीक्षा देऊन त्याने महाराष्ट्र सरकारची नोकरी स्विकारली व शेवटी 'कार्यकारी अभियंता' म्हणून (Executive Engineer) निवृत्त झाला.

त्यावेळी वि. गो. वर्तक हे आमचे प्राचार्य (Principal) व 'नेने'मामा हे 'हेडक्लार्क' होते. दोघेही अत्यंत कडक शिस्तीचे. पहिल्याच वर्षी हे "लिंबोणी प्रकरण" घडले. ही घटना अविस्मरणीय असल्याने त्याचे पडसाद महाराष्ट्रात उमटले. त्यात 'ओल्याबरोबर सुकेही जळते' या न्यायाने मीही भरडला गेल्याने त्याची सविस्तर माहिती देणे आवश्यक आहे.

त्यावर्षी प्रा. नटेशन नवीनच रुजू झाले होते. ते स्वत: अत्यंत हुशार असले तरी त्यांचे व्यक्तिमत्व यथातथाच व शिकवण्याची पद्धतही बेताचीच. त्यामुळे त्यांचा तास नेहमी कंटाळवाणा व्हायचा व त्यामुळे मुलांच्यात चुळबुळ सुरु व्हायची. एकदा मागल्या रांगेत बसणाऱ्यानी त्यांच्या तासाला त्याना लिंबोण्या' मारण्यास सुरवात केली. सुरवातीला त्यांनी दटावण्याचा प्रयत्न केला पण मुलांचा वाह्यातपणा सुरूच होता. दुर्दैवाने त्याचवेळी प्रिन्सिपाल वर्तकांची फेरी सुरु होती व त्यांनी वर्गात चाललेला प्रकार पाहिला. ताबडतोब त्यांचा शिपाई विश्रामला बरोबर घेऊन वर्गात आले आणि दंगा करणाऱ्या मुलांची नावे सांगण्याची आज्ञा केली. अर्थातच कोणीच नावे सांगितली नाहीत. तेव्हा चिडून त्यांनी सर्वांना बाहेर पाठवले; विक्रमला वर्गास कुलूप लावण्यास सांगितले व दारावर नोटीस लावली की 'आठ दिवसात नावे सांगितली नाहीत तर कायदेशीर कारवाई करण्यात येईल' दोनतीन दिवसांनी मुंबईच्या 'इंडियन एक्सप्रेस' वर्तमानपत्रात बातमी आली "What is the price for discipline?"

आठ दिवस उलटून गेले पण कोणीच नावे सांगितली नाहीत. तेव्हा 'टर्म' बुडेल व वर्षसुद्धा वाया जाईल ही चिंता सर्वांना वाटू लागली. तोपर्यत सर्वांच्या घरी पालकांना पत्रे गेली होती. तेव्हा कोठे आमच्या क्लासमधील सर्व विद्यार्थ्यांनी माफी मागितली. वर्तकसरांनी 'टिळक हॉल'मधे 'मिटिंग' घेतली. प्रत्तेकाकडून 'पुन्हा असे करणार नाही' असा माफीनामा लिहून घेतला व शिक्षा म्हणून महात्मा गांधींचा एक पान भरेल असा धडा पुढले १५ दिवस रोज सकाळी ९-९ll च्या दरम्यान ऑफिसात जाऊन 'नेने'मामाना देऊन त्यांनी हजेरी मांडल्यावरच वर्गात जाण्याची परवानगी मिळे. एक 'फुलस्केप' कागद भरेल असा तो धडा होता. त्यातील पहिली ओळ अजुनी लक्षात आहे - "All through his life, GandhijI admired fearlessness and condemned cowardice ….".

[33] FE - First Year, SE-Second Year and BE-Third Year followed by applicable branch

सर्वजण आठ दिवसात कंटाळले. तेव्हा कोणाला 'झेरॉक्स' मशीन व त्यावर कॉपी करता येतात हे माहित नसल्याने काही जणांनी हाताने कॉपी करून देण्याचा उद्योग सुरु केला. परंतु त्यामुळे अक्षरातले साम्य लक्षात येताच ही गोष्ट नेनेमामानी वर्तकांच्या कानावर घातली व त्या दोघांनी एक नवाच परिच्छेद दिला व तो परत १५ दिवस लिहून देण्यास सांगितले! अशा रीतीने अखेर "लिंबोणी प्रकरणा"वर पडदा पडला.

फेब्रुआरी १९५५ मधे कॉलेजची आर्थिक स्थिती बिघडली. त्यावेळी वरच्या स्तरावर काही निर्णय होऊन वालचंद ट्रस्ट, केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी प्रत्तेकी ५ लाख रुपये आणि सांगलीच्या राजेसरकारनी १ लाख रुपये देऊन कॉलेजची आर्थिक घडी बसवून दिली. त्याचबरोबर कॉलेजचे नाव बदलून "वालचंद कॉलेज ऑफ इंजिनीयरिंग" असे केले व नवीन 'मॅनेजिंग कमिटी'ची स्थापना झाली. वयपरत्वे प्रिन्सिपाल वर्तक सेवानिवृत्त झाले व त्यांच्या जागी पुण्याच्या इंजिनीयरिंग कॉलेजचे व्ही. के. केळकर यांची नेमणूक झाली. आता पैशाचे पाठबळ आल्याने त्यांनी लगेच जून '५५ पासून इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल शाखा सुरु केली व त्याच बरोबर 'Development Blocks' या नव्या हॉस्टेलच्या बांधकामालाही सुरवात झाली.

मी स्वत: १९५७मध्ये BE(Civil) पास होऊन लगेच इलेक्ट्रिकल व मेकॅनिकलच्या दुसऱ्या वर्षात प्रवेश घेतला. नंतर १९५९ला BE(Mech.) व १९६० साली BE(Elec.) पास झालो. आपल्या कॉलेजमधून तीन पदव्या मिळवणारा फक्त मीच पहिला व एकटाच!

मेकॅनिकलच्या दुसऱ्या वर्षात मी असताना माझ्यासारखाच BE(Civil) पास झालेला पण मला दोन वर्षांनी 'सिनियर' असलेला औंध संस्थानाच्या राजघराण्याशी निगडीत असा विजय पंत माझ्याबरोबर होता. तत्पूर्वी तो कोयना धरणावर इंजिनीयर म्हणून नोकरी करायचा. वर्गात आम्ही दोघेच BE(Civil) पास होऊन परत कॉलेजमध्ये आल्याने आम्हा दोघाबद्दल कुतूहल असायचे. परंतु दुर्दैवाने त्याच्या मेंदूमध्ये रक्तस्राव झाल्याने नोव्हेंबर १९५७मध्ये त्याचे निधन झाले. त्यामुळे 'सिनियर' असा मी एकटाच उरलो.

१९५४ ते १९६०च्या सहा वर्षांच्या प्रदीर्घ काळात माझा अनेक प्राध्यापक व विद्यार्थ्यांशी संबंध आला. प्रा. बर्वेसरांना माझ्याबद्दल नेहमीच प्रेम व कुतूहल वाटायचे. त्याचप्रमाणे माझ्या सिनियॉरिटीमुळे ते मला वेगळेच वागवत. इलेक्ट्रिकलच्या कुलकर्णी सरांचे आवडते वाक्य मला अजूनही आठवते. "The train may be late but the passengers should not be". १९५७ साली श्री. लोकरे, बेळगावकर, मेहता यांची व मुख्य म्हणजे इलेक्ट्रिकलचे प्रा. तिळवल्ली यांची नेमणूक झाली. तिळवल्ली सरांनी मला शिकवले याचा मला अभिमान वाटतो. त्याचप्रमाणे या संधीबद्दल देवाचे आभार. आज वयाच्या ७९ वर्षीसुद्धा मला शिकायची आवड आहे याचे श्रेय त्यांनाच आहे.

कॉलेज सोडल्यावरही माझा प्राध्यापकांशी संबंध राहिला याची काही उदाहरणे:
१९८५मध्ये माझे दोन्ही मुलगे इंजिनीयरिंगला असताना प्रा. तिळवल्लीनी माझ्या आग्रहाखातर त्यांच्या घरी त्यांना एकेक तास शिकवले. १९७४ साली प्रिन्सिपाल केळकर (पतीपत्नी) माझ्या दोघा मुलांच्या मुंजीला उपस्थित होते आणि प्रा. लोकरे माझ्या मुलाच्या लग्नाला हजर होते.

आता विद्यार्थी मित्रांत माझ्या फक्त जवळच्या काही मित्रांचा येथे उल्लेख करतो. मेकॅनिकलला असताना विश्वास साठे (हा माझा रूम पार्टनरहि होता), पी.ए. कुलकर्णी, कणबूर, गायतोंडे, राजे, "आईनस्टाईन" जोशी, व इलेक्ट्रिकलला असताना सुभाष सुकथनकर, भालू केळकर, पुन्हा गायतोंडे, वगैरे. फक्त "आईनस्टाईन" जोशी सोडला तर बाकीचे सर्व सुदैवाने अजून हयात आहेत.

मी धंदा सुरु केल्यावर कणबूर, विश्वास साठे, छत्रे, गोलवाला व पी.ए. कुलकर्णी यांनी बहुमोल सल्ला दिला. तो कसा विसरू?

सरते शेवटी आपणा सर्वांना कॉलेज सोडून ५० वर्षे झाली तरी सर्वांचा आपले आवडते कॉलेज हा नाजुक पण तितकाच मजबूत धागा आहे. ही कृतज्ञता व आपली नाळ कोठे जोडली आहे हे कोणी विसरले नाही हे हे आपणा सर्वांचेच भाग्य आहे.

## वालचंद कॉलेजच्या काही आठवणी

सुभाष कीर्तने B.E. (Mech.) 1956-1959 [Contact: svkirtane@yahoo.com]

इंजिनियरिंग कॉलेजमध्ये दाखल झाल्याला आता पाच तपांचा काळ उलटून गेला आहे. तरीपण त्यावेळच्या आठवणी अजूनही मनात ताज्या आहेत. त्यातील काही आठवणी.

१९५६ साली फर्ग्युसन कॉलेजमधून 'इंटर सायन्स' पास झालो. खरे म्हणजे पुण्याच्या इंजिनियरिंग कॉलेजमध्येच जायची इच्छा होती पण विधिलिखित काही वेगळेच होते. त्यावेळी मुंबई राज्यातील तिन्ही[34] इंजिनियरिंग कॉलेजमध्ये प्रवेश Office of the Director of Technical Education यातर्फेच दिला जाई व त्याकरता एकच प्रवेश पत्रिका भरावी लागे. त्यात आपल्या निवडीची शाखा (engineering discipline) व कॉलेजचे नाव लिहावे लागे. त्याप्रमाणे 'मेकॅनिकल शाखा' व 'पुण्याचे कॉलेज' असे लिहिले होते. त्यातही शाखेस प्राधान्य द्यावे असेही लिहिले होते. त्यानुसार मला 'मेकॅनिकल शाखेत पण मी पुण्याचा असूनसुद्धा अहमदाबादच्या कॉलेजमध्ये प्रवेश दिला गेला. अर्थातच गुजराथमध्ये जाण्यास सर्वांचाच विरोध.

त्यामुळे सांगलीच्या वालचंद कॉलेजमध्ये मेकॅनिकलला प्रवेश स्विकारला आणि अत्यंत नाखूष मनस्थितीत तेथे दाखल झालो. प्रत्यक्ष सांगलीला गेल्यावर मात्र सर्वच चित्र बदलले. तेथील कॉलेज व वातावरण पाहिल्यावर, इतर विद्यार्थ्यांना आणि सर्व प्रोफेसर्सना भेटल्यावर तेथेच जास्त बरे असे वाटू लागले. अशा रीतीने माझा 'सांगली अध्याय' चालू झाला.

पहिले वर्ष कठीणच आहे असे सर्वजण सांगत होते व घराबाहेर रहाण्याचीही माझी ती पहिलीच वेळ होती. त्यामुळे सर्व काही काटेकोरपणे लक्ष देऊन करत होतो. नव्या ओळखी झाल्या. पुण्याच्याच जयंत शेणोलीकर (तो सिव्हिल शाखेचा) या मित्राबरोबर कॉलेजच्या हॉस्टेलमध्ये राहू लागलो.

आमचे जुने हॉस्टेल यथातथाच होते. कच्च्या भिंती, पत्र्याचे छप्पर. हा अनुभव अगदीच वेगळा होता. तेव्हाची पहिली आठवण. सकाळी ७ वाजेपर्यंत आंघोळ उरकून, मग 'ब्रेकफास्ट' करून पहिल्या तासाला हजर रहावे लागे. आंघोळीकरता गरम पाणी काढून द्यायला एक नोकर होता. तो एखादे जहाज चालवावे तशा थाटात (पाण्याच्या) बंबाच्या तोटीवर हात ठेवून पाण्याची धार एकसारखी कमीजास्त करीत असे. अर्धी बादलीच गरम पाणी मिळे व ती उचलून तो पत्र्याच्याच 'बाथरूम'मध्ये ठेवत असे. चालताना तो एखाद्या नावाड्यासारखा पुढेमागे हलत असे. तो तसे का करत असे हे मला आजपर्यंत कळलेले नाही. त्याचा सततचा कार्यमग्न चेहरा, थंडी असो, पाऊस असो, त्याने पाणी द्यायला एकदाही उशीर केला नाही. म्हणून तो खास माझ्या लक्षात आहे.

पहिले वर्ष व्यवस्थितपणे पार पडले. चांगल्या रीतीने पास झाल्याने आत्मविश्वास वाढला. त्यामुळे अभ्यासाव्यतिरिक्त माझे छंद जोपासण्यात व क्षेत्रात भाग घ्यायचे ठरवले. त्याप्रमाणे टेनिस टीममध्ये शिरकाव केला, 'इंटर कॉलेजिएट' स्पर्धेत भाग घेऊन कॉलेजतर्फे बऱ्याच मॅचेस खेळलो व जिंकलो सुद्धा.

लहानपणापासून मला गाण्याची अतिशय आवड. म्हणून शाळेत असताना शास्त्रीय गायनाच्या परीक्षाही दिल्या होत्या. त्यामुळे कॉलेज गॅदरिंगच्यावेळी संगीत नाटक करण्याचे ठरल्यावर त्याच्या संगीत दिग्दर्शनाची जबाबदारी मला देण्यात आली. त्यावेळच्या आठवणी तर अविस्मरणीय आहेत.

सांगलीतील एका संगीतप्रेमी गृहस्थाकडून एक ऑर्गन मिळवला व त्याच्या साथीवर गाण्याच्या चाली सर्व पात्रांच्याकडून बसवून घेतल्या. त्याचा परिणाम इतका जबरदस्त झाला की सरावाच्यावेळी माझा ऑर्गन ऐकण्यासाठी एकच गर्दी व्हायची. शेवटी प्रिन्सिपॉलनी मला ऑफिसात बोलावून सांगितले की सर्वांना माझे वाजवणे आवडत असले तरी त्यामुळे चालू असलेल्या इतर वर्गांवर विपरीत परिणाम म्हणजे मुलांचे तासाकडे लक्ष लागत नाही. ते ऐकून सहाजिकच मला वाईट वाटले व मी माझी 'प्रॅक्टीस' थांबवली. इतर मुलांनी पुन्हा सरांची भेट घेवून तो उपक्रम चालू करण्यास भाग पाडले. त्यानंतर जेव्हा नाटक सादर झाले तेव्हा

[34] पुण्याचे 'कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, मुंबईचे 'व्हीजेटीआय' आणि अहमदाबादचे 'एल्.डी' कॉलेज.

गाण्यांचा जबरदस्त प्रभाव पडला व त्यामुळे आमच्या कॉलेज चे नाव सर्वत्र झाले. अगदी कोल्हापूर पर्यंत. असो.

अजूनही जेव्हा त्यावेळचे जवळचे मित्र भेटतात तेव्हा वालचंद कॉलेजच्या आठवणींना पुन्हा 'उजाळा' द्यायला व त्यात रमायला आवडते.

----------------------------------------------------------------------
---------------------------------------------तळटीप

अरविंद गोरे हा माझा अगदी जवळचा मित्र. कॉलेज सोडल्यानंतर त्यात मधे ५० वर्षांचा खंड पडला. त्यानंतर गेल्या दहा वर्षापूर्वी आमचा संपर्क झाल्यापासून आमची मैत्री अखंडितपणे चालू आहे. वालचंद कॉलेजच्या आठवणीं एकत्र करण्याच्या कल्पनेस त्याने चालना दिली. आम्हा सर्वांना लिहिते करून व प्रोत्साहन देऊन हा आठवणींचा संग्रह बनवला याबद्दल त्याचे मन:पूर्वक आभार.